# ते एकत्र आल्यास पेढे वाटू..



■ **मुंबई :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे एकत्र येणार असल्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. दोन्ही नेत्यांनी एकत्रित काम करण्याचं जाहीरपणे म्हटलं आहे. या घडामोडीवर शिंदे गटाचे नेते तथा सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी मोठं विधान केलं आहे. दोन्ही ठाकरे एकत्रित आले तर आम्ही पेढे वाटू, असं संजय शिरसाट उपरोधिकपणे म्हणाले. तसेच आम्हाला कोणताही धोका नाही. आमच्या सत्तेला कुठेही धक्का लागणार नाही, असंही शिरसाट यांनी स्पष्ट केलं आहे.

राज ठाकरे यांनी महाराष्ट्र हितासाठी एकत्र येण्याची हाक दिली. मात्र त्याला उद्धव ठाकरे यांनी हवा तसा प्रतिसाद दिला नाही. राज ठाकरे यांचा काय संदेश आहे हे कळते. याची जाणीव आहे. आम्ही आजही नाते टिकविले आहे. आम्ही संदेश न समजायला दूधखुळे नाहीत. तुम्ही युती करा. आत्महत्या करण्याची वेळ कुणावर आली हे कळेल. हे चांडाळ चौकडी लोक कधीच युती होऊ देणार नाही. युती झाल्यास अस्तित्व संपेल ही भीती आहे, असं शिरसाट म्हणाले.

राज ठाकरे यांना कुणाचाही सपोर्ट नसताना त्यांनी पक्ष मोठा केला आणि सांभाळला. सत्तेसाठी प्रत्येकाच्या दारोदार फिरणारे लाचार तुम्ही. लाचारांची फौज तयार झाली असल्याने पक्षाची ही अवस्था झाली आहे. काँग्रेस राष्ट्रवादी सोबत रहा, ते तुम्हाला लाथा मारतील. राज्याचा हिताचे दोन निर्णय सांगा. काँग्रेस आणि राष्ट्रवादी सोबत जाण्याचा तुम्हाला पश्चात्ताप झाला, असा दावाही त्यांनी केला.

# शिंदे गटाचे लोक महाराष्ट्राचे शत्रू



■ **मुंबई :** शिंदे गटाचे नेते हे .... आहेत, त्यांचा महाराष्ट्राशी काही संबंध नाही. ते महाराष्ट्राच शत्रू आहेत. दोन्ही भाऊ एकत्र आले की त्यांच्या शुन्य नशीबी येणार आहे, त्यांना हे नको आहे. त्यांच्या मनात द्वेष भरलेला आहे, असे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे.

संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, शरद पवार आणि अजित पवार अनेकदा सोबत आलेले आहेत. आम्ही तसे एकनाथ शिंदे सोबत तुम्हाला कधी दिसलो का असा सवालही राऊतांनी उपस्थित केला आहे. आम्ही शिंदे गटाला भेटणार नाही. आमच्याकडे संस्था नाहीत, जेथे एकत्र आलो आणि बंद दाराआड बसलो, असा टोला त्यांनी नेत्यांना लगावला आहे.

संजय राऊत म्हणाले की, दैनिक सामनामध्ये जे लिहले आहे, त्याच भावना आतापर्यंत महाराष्ट्राच्या होत्या. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंनी एकत्र येत महाराष्ट्राची सूत्र हाती घ्यावी ही जनभावना आहे. हीच भावना ठाकरे बंधूंनी व्यक्त केली आहे. दोन प्रमुख नेते अशी भूमिका मांडतात तेव्हा आपण ती गांभीर्याने घेत पुढे जायला हवे.

राज ठाकरे - उद्धव ठाकरे यांच्या भूमिकेमुळे अनेकांना वेदना होणार. यांनी दोघांनी एकत्र राजकारण केले तर आम्हाला कायमचे शेतावर जावे लागेल किंवा संघ शाखेत जात संघ दक्ष हेच करावे लागेल. ठाकरे कुटुंबियांवर राज्यातील जनतेचे असलेले प्रेम यामुळे अनेकांना भीती वाटत असेल त्यातून काहीच्या पोटातून मळमळ बाहेर पडत असेल, त्याकडे आम्ही दुर्लक्ष करतो, असेही संजय राऊत म्हणाले.

# तर इंग्रजी शाळा बंद करून दाखवा



■ **मुंबई :** इयत्ता पहिलीपासून हिंदीची सक्ती करण्याच्या मुद्यावरून महाराष्ट्रात चांगलेच महाभारत रंगले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी हिंदीचे समर्थन केल्यानंतर मनसेने त्यांना राज्यातील इंग्रजी शाळा बंद करण्याचे आव्हान दिले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी इयत्ता पहिलीपासून हिंदी सक्ती करण्याच्या आपल्या सरकारच्या निर्णयाचे जोरदार समर्थन केले आहे. इंग्रजीला पालख्या व हिंदीला विरोध हा कुठला विचार आहे? असा खडा सवाल त्यांनी यासंबंधी मनसे व ठाकरे गटावर निशाणा साधत केला होता. त्यानंतर आता मनसेने त्यांच्यावर जोरदार पलटवार केला आहे. मनसे नेते संदीप देशपांडे म्हणाले की, भाजप हा सत्ताधारी पक्ष आहे. त्यामुळे सरकारमधील पक्षाने जबाबदारीने वागले पाहिजे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात पहिली माध्यम भाषा सक्तीची आहे. दुसरी मराठी भाषा सक्तीची आहे. पण तिसरी भाषा म्हणून हिंदी ही अनिवार्य असल्याचे कुठेही नमूद करण्यात आले नाही. यासंबंधी त्या - त्या राज्याला भाषा निवडीचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. पण त्यानंतरही महाराष्ट्रात हिंदीची सक्ती का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

ते पुढे म्हणाले, भाषेच्या मुद्यावर मनसेशी चर्चा करा. भाषा समितीशी चर्चा करा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदीला विरोध करत असताना इंग्रजीला विरोध केला जात नसल्याचा मुद्दा उपस्थित केला. पण ते स्वतःच सरकारमध्ये आहेत. त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन इंग्रजी शाळा बंद कराव्यात. आमचा त्याला विरोध नाही. त्यांनी हिंमत दाखवून इंग्रजी शाळा बंद करून त्या ठिकाणी मराठी शाळा सुरू करून दाखवावी.

## तनिषा भिसे प्रकरणात सरकार आक्रमक

# मंगेशकर रुग्णालयावर कारवाईची कुऱ्हाड

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :** पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात गर्भवती तनिषा भिसे यांच्या मृत्यू प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडवली आहे. या प्रकरणात वैद्यकीय हलगर्जीपणाचा ठपका ठेवत सरकारने आक्रमक पवित्रा घेतला असून, डॉ. सुश्रुत घैसास आणि दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर कठोर कारवाई सुरू केली आहे.

विविध विभागांच्या चौकशी अहवालांनुसार वेगवेगळ्या पातळ्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. याशिवाय, धमार्दाय रुग्णालयांच्या व्यवस्थेत आमूलाग्र बदलांचे प्रस्तावही पुढे आले आहेत.

तनिषा भिसे यांच्या मृत्यू प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी सरकारने वैद्यकीय शिक्षण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग आणि विधी व न्याय विभागामार्फत स्वतंत्र समित्या स्थापन केल्या होत्या. या समित्यांच्या अहवालांनुसार खालील कारवाया करण्यात आल्या आहेतः

**वैद्यकीय शिक्षण विभागाची चौकशी**

ससून रुग्णालयाच्या वैद्यकीय समितीने १८ एप्रिल २०२५ रोजी सादर केलेल्या ६ पानांच्या अहवालात डॉ. सुश्रुत घैसास यांच्यावर निष्काळजीपणाचा ठपका ठेवण्यात आला.

या अहवालाच्या आधारे पुणे पोलिसांनी डॉ. घैसास यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०६(१) अंतर्गत निष्काळजीपणाने मृत्यूस कारणीभूत ठरल्याचा गुन्हा दाखल केला आहे. पुणे पोलिस उपायुक्त संभाजी कदम यांनी सांगितले की, पोलिस योग्य ती कारवाई करतील.



**मेडिकल काऊन्सिलच्या सुनावणीत डॉ. घैसास गैरहजर**

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील तनिषा भिसे मृत्यू प्रकरणाची मेडिकल काऊन्सिल येथे सुनावणी पार पडली. या सुनावणीला भिसे कुटुंबीय उपस्थित होते. त्यांनी काऊन्सिलपुढे त्यांच्या जवळ असलेले सर्व रिपोर्ट आणि पुरावे सादर केले. याच सोबत भिसे कुटुंबीयांनी काही महत्त्वाच्या मागण्या देखील काऊन्सिलसमोर केल्या आहेत.

या सुनावणीला मात्र डॉ. सुश्रुत घैसास उपस्थित नव्हते. त्यांनी ईमेलद्वारे येऊ शकत नसल्याचे मेडिकल काऊन्सिलला कळवले होते. मेडिकल काऊन्सिल येथे झालेल्या सुनावणीनंतर भिसे कुटुंबीयांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला.

ते म्हणाले, तनिषा भिसे यांची खोटी माहिती प्रसारित करण्यात आली होती, त्याबद्दल आम्ही माहिती दिली आहे. आम्हाला आता पुढच्या सुनावणीसाठी बोलावले आहे. यावेळी डॉ. घैसास उपस्थित नव्हते.

त्यांचे मेडिकल लायसन्स रद्द करण्याची प्रक्रिया सुरू करावी, शिस्तभंगाची कारवाई करावी तसेच ट्रस्टच्या प्रशासनावर कारवाई करावी जेणेकरून भविष्यात कुठल्याही कुटुंबाला अमानविय त्रास सहन करावा लागू नये, अशा मागण्या आम्ही काऊन्सिलसमोर केल्या आहेत.

**आरोग्य विभागाची चौकशी**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अहवालात दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने इंडियन मेडिकल कौन्सिलच्या व्यावसायिक नियमांचे उल्लंघन केल्याचे नमूद आहे. यामुळे डॉ. घैसास आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमार्फत कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत.

महाराष्ट्र सुश्रुषागृह नोंदणी नियम २०२१ च्या उल्लंघनामुळे पुणे महानगरपालिकेला रुग्णालयावर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० चा भंग झाल्याने विधी व न्याय विभागाने धमार्दाय आयुक्तांमार्फत कारवाई सुरू केली आहे.

**विधी व न्याय विभागाची चौकशी**

धर्मादाय सहआयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समितीने ८ एप्रिल २०२५ रोजी आपला अहवाल विधी व न्याय विभागाला सादर केला. या अहवालानुसार, दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाला १० लाख रुपये दंड ठोठावण्यात आला आहे. यापैकी प्रत्येकी ५ लाख रुपयांच्या दोन फिक्स्ड डिपॉझिट्स (एफडी) तनिषा भिसे यांच्या दोन मुलींच्या नावे केल्या जाणार आहेत. या मुली सज्ञान झाल्यावर त्यांना व्याजासह ही रक्कम मिळेल.

तनिषा भिसे यांच्या दोन्ही मुलींच्या उपचारांचा खर्च मुख्यमंत्री सहायता निधीतून उचलण्याचा निर्णय यापूर्वीच घेण्यात आला आहे.

तनिषा भिसे प्रकरणाने धर्मादाय रुग्णालयांच्या कार्यपद्धतीतील त्रुटी उघड्या पडल्या आहेत. यामुळे सरकारने खालीलप्रमाणे कठोर नियम लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

धर्मादाय रुग्णालयांतील सर्व रुग्णसेवा संपूर्णपणे ऑनलाइन ठेवाव्या लागतील. धर्मादाय रुग्णालयांचे नियोजन मुख्यमंत्री धर्मदाय कक्षाच्या माध्यमातून केंद्रीय स्तरावरून होईल. कोणत्याही रुग्णाकडून उपचारापूर्वी ॲडव्हान्स रक्कम मागता येणार नाही. धर्मादाय रुग्णालयांना त्यांच्या १० टक्के निधीचा उपयोग गरिब रुग्णांसाठी करणे बंधनकारक असेल. याबाबतचे लेखे नियमितपणे सादर करावे लागतील.

# ही घ्या कामांची यादी...



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :** मनसे, ठाकरे गट युतीसंदर्भात प्रश्न विचारताच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे चांगलेच संतापले होते, कामाचं बोला असं त्यांनी म्हटलं, त्यानंतर आता मनसे नेते राजू पाटील यांनी एकनाथ शिंदे यांना थेट कामांची यादीच पाठवली आहे, त्यांनी ट्विट करत एकनाथ शिंदे यांना काही प्रश्न विचारले आहेत.

राजू पाटील म्हणाले, जे कामाचे नाहीत, ते श्री प्रभू रामाचे पण नाहीत! परवा आमचे पालकमंत्री एकनाथ शिंदे मनसे-शिवसेना (उबाठा) युतीबाबत विचारलेल्या एका प्रश्नासंदर्भात संबंधित पत्रकाराला चिडून बोलले की कामाचे बोला. चला तर मी पण काही कामाचे प्रश्न त्यांना विचारतोच. किमान नगरविकास मंत्री व आमचे पालकमंत्री म्हणून तरी उत्तर अपेक्षित आहे.

पलावा पुल कधी होईल? लोकग्राम पुल कधी होईल? दिवा रेल्वे फ्लाइ कधी होईल? बिल्डरांच्या फायद्यासाठी सुरू केलेल्या कल्याण-तळोजा मेट्रोचे भूसंपादन कधी होईल? आणि जर ते झाले नसेल तर ठेकेदाराच्या फायद्यासाठी सुरू केलेले मेट्रोचे हे काम, ज्यामुळे वाहतुक कोंडीत अधिकच भर पडत आहे ते काम कधी स्थगित करणार? कल्याण-शीळ रस्ते बाधित शेतकऱ्यांना मोबदला कधी मिळेल व तिसरी लाईन कधी होईल? २७ गावांसाठी असलेली अमृत योजना कधी पुर्ण करणार? कल्याण-डोंबिवलीकरांच्या हक्काचा नवी मुंबईला दिलेला १४० एलएलडी पाणी कोटा आम्हाला कधी वर्ग करणार? अनधिकृत पणे सुरू केलेला दिवा डंपिंग कधी बंद करणार? नवी मुंबईत नव्याने घेतलेल्या १४ गावांच्या विकासासाठी आवश्यक ५९०० कोटी रूपयांचा पॅकेज कधी देणार? कल्याण-डोंबिवलीतल्या २७ गावांचा प्रश्न कधी मार्गी लावणार? मानपाडा रोड व कल्याण-शीळ रस्त्यावरील अनधिकृत बांधकामे कधी हटविणार? अशी लांबलचक यादी पाठवत एकनाथ शिंदे उत्तर द्या, असं ट्विट राजू पाटील यांनी केलं आहे.

# भाषा सल्लागार समितीचा संताप

■ **मुंबई :** महाराष्ट्र सरकारने प्राथमिक शिक्षणात हिंदी अनिवार्य करण्याच्या निर्णयाला राज्य भाषा सल्लागार समितीने तीव्र विरोध दर्शविला आहे. समितीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून हा जीआर (शासकीय निर्णय) तातडीने रद्द करण्याची मागणी केली आहे. सरकारने हा निर्णय घेताना समितीचा सल्ला घेतला नसल्याचा आरोप देशमुख यांनी केला आहे.

देशमुख यांनी पत्रात म्हटले की, हिंदीच्या सक्तीमुळे मराठीसह स्थानिक भाषांचे महत्त्व कमी होण्याचा धोका आहे. हा निर्णय मराठी भाषेच्या अस्मितेवर घाला घालणारा आहे. सरकारने स्थानिक भाषांचा विचार न करता एकतर्फी निर्णय घेतला, असे त्यांनी नमूद केले. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या समितीला डावलून घेतलेल्या या निर्णयामुळे सांस्कृतिक आणि राजकीय वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

या मुद्द्याने राजकीय वातावरण तापले असून, विरोधी पक्षांनीही सरकारवर टीकास्त्र सोडले आहे. भाजपने हा निर्णय राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याचे सांगितले आहे.

# भावानेच केली सात वर्षीय बहिणीची हत्या

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई,दि. २१ :** वसई येथे एका ७ वर्षीय चिमुकलीचा मृत्यू झाला होता. हा मृत्यू सुरुवातीला अपघातामुळे झाल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, आता धक्कादायक माहिती उघडकीस आली आहे.

७ वर्षांच्या अंजली मिथुन शर्मा या चिमुकलीचा मृत्यू अपघात नसून तिच्याच १२ वर्षीय भावाने तिची हत्या केली असल्याची माहिती समोर आली आहे. क्षुल्लक वादातून हा खून झाल्याची माहिती गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अविनाश कुराडे यांनी दिली आहे.

वसई पूर्व येथील पेल्हार परिसरात ही दुर्दैवी घटना घडली आहे. यावेळी अंजली घरी एकटीच होती. तिचे आई-वडिल कामानिमित्त बाहेर गेले होते. यावेळी अंजलीचा भाऊ बाहेर खेळत होता, अशी माहिती सुरुवातीच्या तपासात देण्यात आली होती. मात्र पोलिसांनी कसून चौकशी करत प्रकरण उघडकीस आणले आहे.

अंजलीने स्वयंपाकघरातील ओट्यावर ठेवलेले सामान काढण्यासाठी स्टूलवर चढण्याचा प्रयत्न केला. मात्र, स्टूलवरून घसरून ती खाली पडली आणि मानेजवळचा भाग किशनच्या पक्कडवर आपटला व यात ती गंभीर जखमी झाली. ही घटना घडली तेव्हा घरात आई वडील नव्हते. शेजाऱ्यांनी अंजलीला वसई विरार महानगरपालिकेचे तुळिंज रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी उपचारापूर्वीच अंजलीला मृत घोषित केले.

शवविच्छेदनाचा अहवाल तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारावर वसई विरार गुन्हे शाखेने तपास सुरू केला. यावेळी पोलिसांनी अंजलीच्या १२ वर्षीय भावाची कसून चौकशी केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली. किरकोळ वादातून चिडून त्यानेच आपल्या बहिणीला पक्कडने मारल्याचे त्याने कबूल केले आहे. या प्रकरणात मुलावर बालन्याय प्रणाली अंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे. पेल्हार पोलिस ठाणे आणि गुन्हे शाखा विभागातर्फे या प्रकरणाचा सखोल तपास केला जात आहे.

# ..तर घरातल्या लोकांना बाहेर झोपावं लागते!

**संग्राम थोपटेंना भाजपामधूनच विरोध**

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई,दि. २१ :** भोर विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसचे माजी आमदार संग्राम थोपटे यांनी काँग्रेसला रामराम ठोकत भारतीय जनता पक्षात (भाजप) प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे.

मात्र, थोपटेंच्या या पक्षांतराने भोर मतदारसंघातील निष्ठावंत भाजप कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. भाजपचे मुळशी तालुका सरचिटणीस दत्तात्रय जाधव यांनी याबाबत पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना पत्र लिहून आपला संताप व्यक्त केला आहे.

जाधव यांनी पत्रात म्हटले आहे की, ज्यांचा आपण आयुष्यभर तिरस्कार केला, ते उद्या आपल्या सोबत येणार याचं विशेष आश्चर्य वाटतं. घरात बाहेरचे पाहुणे जास्त झाले की घरातल्या लोकांना बाहेर झोपावं लागतं. या शब्दांत त्यांनी बाहेरून येणाऱ्या नेत्यांमुळे निष्ठावंत कार्यकर्त्यांना दुर्लक्षित केले जात असल्याचा आरोप केला आहे.

थोपटेंच्या भाजप प्रवेशामुळे स्थानिक कार्यकर्त्यांना डावलले जाण्याची भीती आहे. पक्षाने बाहेरील नेत्यांना सामावून घेताना स्थानिक नेत्यांचे आणि कार्यकर्त्यांचे मनोबल टिकवण्यासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे हेनेते म्हणतात.

## राज ठाकरेंच्या घराच्या परिसरात

# भाजपची बॅनरबाजी




■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई,दि. २१ :** ही नव्हे भाषेची सक्ती, ही तर महाराष्ट्राची भक्ती, तोडत नाही तर भाषा जोडते असे भाजपचे बॅनर मनसे प्रमुख राज ठाकरेंच्या घराच्या परिसरात लागले आहेत. ठाकरे बंधू एकत्र येणार ही चर्चा असताना भाजपने मनसेला डिवचण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे.

राज्याच्या राजकारणात सध्या ठाकरे बंधू एकत्र येणार असल्याच्या चर्चेने जोर धरला आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे यांनी तसे संकेत दिले आहेत. यामुळे मनसेशी जवळीक वाढवण्याचा प्रयत्न करणाऱ्या भाजपने बॅनरबाजी करत त्यांच्या हिंदीच्या मुद्यावरुन मनसेला डिवचले आहे.

दुसरीकडे शिवसेना नेते योगेश कदम यांनी राज ठाकरेंना आपुलकीचा सल्ला म्हणत उबाठाला स्वार्थ साधून झाला की रक्ताची नाती नकोशी होतात. हे राजसाहेबांना वेगळे सांगायची गरज नाही, जरा जपून, तुम्ही मनापासून हात पुढे करताल आणि ते पुढे तुमचेच पाय खेचतील.

योगेश कदम म्हणाले की, उबाठा गटाच्या प्रमुखांची निती ही वापरा आणि फेकून द्या, ही राहिलेली आहे. स्वतःचा स्वार्थ साधुन झाला की त्यांना रक्ताची नाती सुद्धा नकोशी होतात आणि याचा प्रत्यय खुद्द सन्माननीय राजसाहेब ठाकरेंना देखील आहे.

नारायण राणे, मनोहर जोशी, दिवाकर रावते, लीलाधर डाके, रामदास कदम आणि एकनाथ शिंदे यांना सुद्धा गरज सरो नी वैद्य मरो प्रमाणे कसे डावलले हे वेगळ्याने सांगायला नको. त्यामुळे जरा जपून, आपण मनापासून हात पूढे कराल आणि भविष्यात तुमचेच पाय खेचले जातील.

# संभाव्य युतीवर बोलू नका

## निगेटिव्ह सूर असणाऱ्या पदाधिकाऱ्यांना राज ठाकरे यांची तंबी



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २१ :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व मनसे प्रमुख राज ठाकरे हे दोघे भाऊ महाराष्ट्र हितासाठी टाळी देणार अशी चर्चा सुरू आहे. यात मनसे आणि शिवसेनेच्या नेत्यांमध्ये वाकयुद्ध रंगले आहे. तर आता मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी आपल्या कार्यकर्ते आणि नेत्यांना उद्धव ठाकरेंसोबतच्या युतीबाबत बोलू नका अशा सूचना दिल्या आहेत.

राज ठाकरे हे सध्या परदेशात आहे. ते महाराष्ट्रात परतल्यानंतर मनसे-उबाठाच्या एकत्रित येण्यावर सविस्तर बोलतील. तोपर्यंत युतीच्या मुद्द्यावर कुणीही बोलू नये. संवेदनशील विषयावर बोलणे टाळा असा थेट आदेश राज ठाकरेंनी कार्यकर्त्यांना आणि नेत्यांना दिला आहे.

मनसेचे नेते यशवंत किल्लेदार म्हणाले होते की, महाराष्ट्रासाठी एकत्र येत असाल तर अटी-शर्ती कशाला घालता? जेव्हा एक मनाने एक दिलाने महाराष्ट्र पुढे जाऊ, तेव्हा सर्व काही बाजूला पडलेले असेल!.

मनसेचे नेते अमेय खोपकर म्हणाले की, अशी अभद्र युती होऊ नये हीच ईश्वर चरणी प्रार्थना, असे म्हटले होते. तर संदीप देशपांडेंनी म्हटले की, तू इतक्या जागा लढव, मी तितक्या लढवतो, तू ही जागा लढव, मी ही जागा लढवतो, तुला हे पद, मला हे पद, इतका मर्यादित विचार करून चालणार नाही. फक्त निवडणूक एवढाच विचार केला तर ती वैचारिक दरिद्रता असेल.

संजय राऊत म्हणाले की, राज ठाकरेंच्या मनात काही विचार पक्के असल्याशिवाय त्यांनी एकत्र काम करण्याची इच्छा व्यक्त केली नसती, हे जर त्यांच्या पदाधिकाऱ्यांना कळत नसेल तर मी काय बोलणार. जेव्हा उद्धव ठाकरेंनी ही भूमिका मांडली तेव्हा आमच्या शिवसैनिकांना स्पष्ट संदेश दिला आहे.

**देशपांडे-राऊतांमध्ये वाकयुद्ध**

संदीप देशपांडेंनी उद्धव ठाकरे यांच्या अटीचा उल्लेख करत म्हटले की, त्यांनी भाजपला धोका दिला, आता पवारांनाही देतील, मनसेने त्यांच्यावर विश्वास कसा ठेवायचा, असा सवाल विचारला होता. तर संजय राऊत यांनी, महाराष्ट्रद्रोही कोण हे राज ठाकरे यांना कळणार नसले तर त्यांच्यासाठी प्रशिक्षण वर्ग सुरु करावा लागेल, असा टोला लगावला होता.

राज ठाकरे म्हणाले की, एकत्र येणे आणि एकत्र राहणे फार कठीण आहे असे मला वाटत नाही. प्रश्न फक्त इच्छाशक्तीचा आहे. हा माज्या वैयक्तिक इच्छेचा किंवा स्वाथार्चा विषय नाही. मला वाटते की आपण महाराष्ट्राचे मोठे चित्र पाहिले पाहिजे. माझा असा विश्वास आहे की महाराष्ट्रातील सर्व राजकीय पक्षांमधील मराठी लोकांनी एकत्र येऊन एक पक्ष स्थापन केला पाहिजे.


# पोलीस निरीक्षक कुरुंदकरला जन्मठेप

## अश्विनी बिद्रे हत्या प्रकरण : कुंदन भंडारी, पार्डीकरला प्रत्येकी ७ वर्षांची शिक्षा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :** पनवेल सत्र न्यायालयाने सोमवारी बहुचर्चित अश्विनी बिद्रे हत्या प्रकरणात मुख्य आरोपी अभय कुरुंदकरला जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. कोर्टाने या प्रकरणातील कुंदन भंडारी व महेश पार्डीकर या इतर दोन आरोपींनाही प्रत्येकी ७ वर्षांची शिक्षा ठोठावली आहे. या दोघांनी शिक्षेचा कालावधी तुरुंगात काढल्यामुळे त्यांची तुरुंगातून सुटका होण्याची शक्यता आहे.

सहाय्यक पोलिस निरीक्षक अश्विनी बिद्रे ११ एप्रिल २०१६ रोजी अचानक बेपत्ता झाल्या होत्या. तत्पूर्वी त्यांनी वरिष्ठ पोलिस निरीक्षक अभय कुरुंदकर याची पोलिस ठाण्यात भेट घेतली होती. कुरुंदकरने स्वतःच्या कारमध्ये गळा दाबून हत्या केली होती. नंतर त्यांचे लाकूड कापण्याच्या कटरने तुकडे केले होते. हे तुकडे त्यांनी वसईच्या खाडीत फेकले होते. तब्बल ९ वर्षांनी कोर्टाने या प्रकरणी कुरुंदकरला जन्मठेप व २० हजार रुपयांच्या आर्थिक दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

अश्विनी बिद्रे-गोरे या नवी मुंबईतील कळंबोलीतून १५ एप्रिल २०१६ पासून बेपत्ता झाल्या होत्या. पोलिस अधिकारी अभय कुरुंदकर यांनीच बिद्रेंना बेपत्ता केल्याचा आरोप अश्विनी बिद्रे यांच्या कुटुंबाने केला होता. तपासात पोलिस सहकार्य करत नसल्याचा आरोप सुरुवातीला अश्विनी यांच्या कुटुंबीयांनी केला होता.



अश्विनी जयकुमार बिद्रे या मूळच्या कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील आळते गावच्या होत्या.

२००५ साली त्यांचा विवाह हातकणंगले गावातील राजू गोरे यांच्यासोबत झाला. लग्नाआधीपासूनच त्या स्पर्धा परीक्षेची तयारी करत होत्या. लग्न झाल्यानंतर एकाच वर्षातच अश्विनी स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झाल्या. त्यांना पोलीस उप-निरीक्षक पद मिळाले. पोलिस दलात रुजू झाल्यानंतर त्यांची पहिली पोस्टिंग पुणे आणि त्यानंतर सांगली इथे झाली. यादरम्यान त्यांची ओळख त्याच पोलिस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस अधिकारी अभय कुरुंदकर यांच्यासोबत झाली.

या दोघांमध्ये जवळीक वाढली. त्यानंतर २०१३ साली अश्विनी बिद्रे यांना प्रमोशन मिळाल्याने त्या रत्नागिरीला आल्या. अभय कुरुंदकर तिथेही अश्विनीला भेटण्यासाठी वारंवार यायचा. हे सर्व प्रकरण अश्विनी यांचे पती आणि वडिलांना समजले होते. काही दिवसांनी अश्विनी बिद्रे-गोरे बेपत्ता झाल्या आणि त्यांचा खून झाल्याचे अखेर उघड झाले.

अभय कुरुंदकरचा बालमित्र असलेल्या महेश फळशीकरने अश्विनी यांच्या हत्येची कबुली दिली होती. अश्विनी यांची हत्या करुन, लाकूड कापण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कटरने त्यांच्या मृतदेहाचे तुकडे करण्यात आले होते. त्यानंतर हे तुकडे वसईच्या खाडीत फेकून देण्यात आले होते.

अश्विनी बिद्रे यांच्याशी कोणताच संपर्क होत नसल्याने पती राजू गोरे आणि मुलगी सिद्धी यांनी कळंबोली पोलिस ठाण्यात जाऊन चौकशी केली होती. मात्र त्यांना तिथे काहीही माहिती मिळाली नाही. त्यांनी अश्विनी बिद्रे बेपत्ता असल्याची तक्रार दिली. अश्विनी बिद्रे ज्या फ्लॅटमध्ये राहत होत्या, त्या फ्लॅटचं कुलूप तोडून मोबाईल व लॅपटॉपची तपासणी केली होती.

या तपासणीतूनच अश्विनी बिद्रे आणि या हत्याकांडातील बडतर्फ वरिष्ठ पोलिस निरीक्षक अभय कुरुंदकर यांच्या संबंधाबाबत माहिती समोर आली होती. यानंतरच अश्विनी बिद्रे यांच्या जीवाचे काहीतरी बरे वाईट झाल्याच्या संशयावरून कळंबोली पोलिस ठाण्यात याबाबत फिर्याद नोंदवण्यात आली होती. या फियार्दीत पोलीस निरीक्षक कुरुंदकर यांच्यासह राजू पाटील, महेश फळणीकर आणि कुंदन भंडारी यांच्यावर गुन्हा दाखल झाला होता.

मात्र, राजकीय संपकार्तून बिद्रे आणि गोरे कुटुंबीयांवर प्रचंड दबाव आणला गेला. तरीही हा दबाव झुगारून राजू गोरे यांनी दर आठवड्याला सुनावणीसाठी पनवेल आणि मुंबईत फेऱ्या मारल्या. तत्कालीन मुख्यमंत्री आणि राज्यपाल यांची भेट घेतली होती.

या प्रकरणाच्या तपासाबाबत न्यायालयानेही नाराजी नोंदवली होती. अभय कुरुंदकरने पदाचा गैरवापर करून गुन्हा दडवण्याचा प्रयत्न केला. अखेर उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर खऱ्या अर्थाने या प्रकरणाचा तपास सुरू झाला. त्यानंतर १ जानेवारी २०१७ ला या प्रकरणात गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर वर्षभराने आरोपीला अटक झाली होती. आज न्यायालयाने कुरूंदकरला जन्मठेपेची शिक्षा ठोठावली.

महासागर भंडारा मंगळवार २२एप्रिल२०२५ पान ३

# प्रवाश्यांच्या सुलभतेसाठी १५ जून पर्यंत उन्हाळी जादा बसेस

**भंडारा :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,भंडारा विभागाच्या वतीने १५ एप्रिल,ते १५ जून,२०२५ पर्यत जादा उन्हाळी बसेस सोडण्यात येत आहे.या कालावधीत भंडारा, गोंदिया,साकोली,तुमसर,तिरोडा,व पवनी बसस्थानकावरुन खालील प्रमाणे अतिरीक्त जादा वाहतुकीचे नियोजन करण्यात आलेले आहे. भंडारा ते राजुरा जातांना ८.३० वाजता येतांना १४.३० वाजता आहे. व भंडारा, तुमसर,हिंगणघाट जातांना १५.२० वाजता येतांना ६.१५ वाजता आहे.व भंडारा परतवाडा जातांना ७.२० वा. येतांना १४.३० वाजता.व भंडारा ते यवतमाळ जातांना ९.०० वाजता ते येतांना १५.०० वाजता. तुमसर ते अमरावती जातांना ७.४५ वाजता व येतांना १४.०० वाजता आहे.तसेच तुमसर ते वर्धा जातांना ७.१५ वाजात आहे.तर येतांना १२.१५ वाजता आहे.व तुमसर ते चंद्रपूर जातांना ७.०० वाजता आहे. तर येतांना१३.३० वाजता आहे.व तिरोडा ते अमरावती जातांना ६.३० वाजता आहे.तर येतांना १३.३० वाजता आहे.व तिरोडा ते अमरावती जातांना ७.३० वाजता आहे.तर येतांना १४.३० वाजता आहे. वरिल प्रमाणे उन्हाळी जादा हंगामाकरिता फेऱ्या प्रवासी वर्दळ पाहून टप्पा टप्प्याने सुरु करण्यात येणार असून त्यानुसार या फेऱ्या संगणकीय आरक्षण प्रणालीवर व रिजव्हेशन उपलब्ध राहतील.तसेच प्रवासी गर्दीचा प्रतिसाद बघून बसस्थानकावरुन शिवशाही,निमआराम,साधारण बसेस वेळोवेळी नागपूर मार्गावर अतिरीक्त बसेस सोडण्यात येणार आहे. तरी सर्व प्रवासी बांधवानी उन्हाळी जादा हंगाम २०२५ करीता लावण्यात येणाऱ्या बसेसचा वापर करण्याकरीता राज्य परिवहन



महामंडळ भंडारा विभागामार्फत आवाहन करण्यात येत आहे.तरी सर्व प्रवासी बांधवानी अवैध प्रवासी वाहनाने प्रवास करणे टाळून राज्य परिवहन महामंडळास सहकार्य करावे असे विभाग नियंत्रक भंडारा यांनी कळविले आहे.

# चार महिने होऊनही ऊसाचे चुकारे न मिळाल्याने शेतकरी अडचणीत :आंदोलन करण्याचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा , दि. २१ एप्रिल :** मोहाडी तालुक्यातील देव्हाडा बु. येथे मानस अग्रो साखर कारखाना असून मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी ऊस पिकाची लागवड केली. त्यानुसार २०२४-२५ हंगामातील ऊसाचे गाळप झाले असून अजूनही शेतकऱ्यांना चार महिने होऊनही ऊसाचे चुकारे मिळाले नाही. डिसेंबर महिन्यातील ऊसाचे चुकारे देण्यात आले मात्र. जानेवारी महिन्यापासुन ऊसाचे चुकारे न केल्याने ऊस उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे. सदर थांबलेले चुकारे तात्काळ शेतकऱ्यांना देण्यात यावे, अन्यथा रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा संतप्त ईशारा तुमसर तालुक्यातील परसवाडा (सिहोरा) येथील शेतकरी अंकुश हूड, अरुण राऊत, अतुल नंदरधने, राधेश्याम राऊत, बाळकृष्ण विठुले, अशोक मेटे, वसंत पांडे, प्रेमलाल मोरे, अनिल लांडगे, मधुकर गोरले, पुन्हात्री देशमुख, गंगाधर राऊत, गोविंदा शेंडे, पुरुषोत्तम मोरे, दिलीप राऊत सह ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी साखर कारखानाच्या प्रशासनाला दिलेल्या निवेदनातून केलेला आहे.

ऊस पिकाची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना ऊसाचे चुकारे मिळाले नसल्याने शेतीवर उचलेला कर्ज वेळेवर भरले गेले नसल्याने त्यांच्या वर व्याजासह रक्कम भरण्याची नामुष्की ओढवली आहे, ऊस पिक हा वर्षे भराचा आहे. त्यामुळे ऊसाची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना ऊसाचे चुकारे मिळाले नंतरच बँकांचे कर्ज परतफेड करावे लागते. मात्र कारखाना प्रशासनाच्या हलगर्जी पणामुळे वेळेवर चुकारे होत नसल्याने ऊस उत्पादक शेतकरी विवंचनेत सापडला आहे. त्यामुळे कारखाना प्रशासन शेतकऱ्यांना ऊसाचे चुकारे देईल का ? की पुन्हा वर्षेभर कारखान्याचे चकरा माराव्या लागतील हे वेळच ठरवणार आहे.

वेळेवर ऊसाचे चुकारे मिळत नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी ऊसाची लागवड कमी केली असून नगदी पिकाची लागवड करायला सुरुवात केली आहे. यात ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ऊस लागवडीचे प्रमाण कमी करून पालेभाजी, वांगे, मिरचिची लागवड व चार महिन्यात मका पिकाची फसल निघते आणि पैसे शुध्दा वेळेवर मिळत असल्याने शेतकरी समाधानी आहेत.

> ‘मानस अग्रो साखर कारखाना देव्हाडा बु. येथील प्रकार डिसेंबर महिन्यातील ऊसाचे चुकारे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना देण्यात आले आहेत. जानेवारी पासून देणे बाकी आहे. मात्र ज्या शेतकयांना कार्यक्रमासाठी आवश्यक होते. त्या शेतकऱ्यांना शुध्दा चुकारे देण्यात आले. परंतु, उर्वरित २४ ते २५ कोटी रुपयाचे ऊसाचे चुकारे बाकी आहेत. संचालकांना विश्वासात न घेता गत दोन वर्षापासून संचालक मंडळाची साधी बैठक घेण्यात आली नाही. त्यामुळे संचालक मंडळ नाराजी व्यक्त करीत आहेत.’
>
> **युवराज हूड, संचालक, मानस कारखाना देव्हाडा (बु.)**
>
> ‘जानेवारी महिन्यात ऊस कारखान्याला नेण्यात आला मात्र चार महिने होऊनही ऊसाचे चुकारे मिळाले नसल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर आर्थिक संकटात आले आहेत. त्यामुळे कारखाना प्रशासनाने ऊसाचे चुकारे लवकरात लवकर देण्याची व्यवस्था करावी, अन्यथा आम्हा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना नाईलाजास्तव रास्ता रोको आंदोलन करावे लागेल.’
>
> **ऊस उत्पादक शेतकरी**

# बालविवाहास प्रतिबंध : विवाह बुकींगपूर्वी वयाची खातरजमा अनिवार्य - जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा, दि. २१ एप्रिल :** अक्षय तृतीयाच्या शुभमुहूर्तावर मोठ्या प्रमाणात एकल व सामूहिक विवाह समारंभांचे आयोजन करण्यात येते. यावर्षी ३० एप्रिल २०२५ रोजी अक्षय तृतीया असल्याने, या दिवशी होणाऱ्या विवाह सोहळ्यांमध्ये बालविवाहाची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे भंडारा जिल्हा प्रशासनाने बालविवाह रोखण्यासाठी कठोर पावले उचलली आहेत.



जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी भंडारा यांनी बालविवाह प्रतिबंध आदेश लागू केला असून, कोणत्याही विवाह समारंभाचे बुकींग करताना वधूचे वय किमान १८ वर्षे आणि वराचे वय किमान २१ वर्षे पूर्ण झाल्याची खातरजमा करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

या आदेशानुसार, विवाह समारंभात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग असलेल्या व्यक्तींना -जसे की लग्नपत्रिका छपाई करणारे प्रेस चालक, मंडप डेकोरेशन चालक, फोटोग्राफर, आचारी, मंगल कार्यालय व्यवस्थापक, बँडवादक, कॅटरिंग चालक तसेच विविध धार्मिक स्थळांवरील विवाह लावणारे - यांना विवाहाचे काम स्वीकारण्यापूर्वी वधू-वरांच्या वयाची योग्य कागदपत्रांद्वारे पडताळणी करणे आवश्यक आहे.

## आधार कार्ड ग्राहय नाही - वैध पुराव्याची आवश्यकता

वयाचा पुरावा म्हणून आधार कार्ड ग्राहय धरले जाणार नाही. याऐवजी जन्म प्रमाणपत्र, शाळेचे ट्रान्सफर सर्टिफिकेट (TC), बोनाफाईड प्रमाणपत्र ही कागदपत्रे आवश्यक राहतील, असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी स्पष्ट केले आहे.

## कठोर शिक्षेची तरतूद

बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ नुसार, बालविवाहास चालना देणाऱ्या, त्यास अनुमती देणाऱ्या किंवा हलगर्जीपणा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस दोन वर्षांपर्यंत सश्रम कारावास आणि एक लाख रुपये दंडाची तरतूद आहे.

## बालविवाह प्रतिबंधासाठी यंत्रणा सज्ज

ग्रामीण भागात ग्रामसेवक व शहरी भागात बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

बालविवाहाच्या माहितीकरिता जिल्हा बाल संरक्षण अधिकारी नितीनकुमार साठवणे (मो. ९३०९११०८९७) किंवा महिला व बाल विकास विभागाच्या चाईल्ड हेल्पलाईन १०९८ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवहन .

# ‘त्या ’गावात देतात नववधूना साडी व वृक्ष भेट

## टांगा गावाचा स्तुत्य उपक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**मोहाडी , दि. २१ एप्रिल :** राज्यात अनेक ग्रामपंचायती गावात वेगवेगळा उपक्रम राबवितात आणि चर्चेत येतात , याचाच एक भाग म्हणून मोहाडी तालुक्यातील टांगा ग्रामपंचायतीने ‘ माझा गाव माझा सन्मान ’ या उपक्रमा अंतर्गत गावातील लग्न होऊन सासरी जाणाऱ्या नववधूला माहेरची साडी एक वृक्ष आणि स्मृतीचिन्ह देऊन एक स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे. त्यामुळे टांगा ग्रामपंचायत जिल्ह्यात चर्चेत आहे . नव्याने निवडून आलेल्या ग्रामपंचायत कमिटीने गावात वेगवेगळे कार्यक्रम राबविणे सुरू केले आहे . गावातील शाळा, मंदिरे यांची अनेक दिवसानंतर रंगरंगोटी करण्यात आली आहे . त्यामुळे गावात प्रसन्नतेचे वातावरण आहे .



गावात रविंद्र भैय्या तिजारे यांच्या मुलीच्या लग्न कार्याप्रसंगी ग्रामपंचायत टांगा च्या वतीने सुरू करण्यात आलेल्या माहेरची साडी, वृक्ष भेट व स्मृतिचिन्हे भेट या योजनेचे साहित्य भेट देण्यात आले . आपल्या गावातील मुलीला माहेरच्या साडीची माहेरची आठवण असावी म्हणून सामाजिक बांधिलकी जोपासण्याच्या हेतूने ही नाविन्यपूर्ण योजना ग्रामपंचायत टांगाच्या वतीने सुरू करण्यात आलेली आहे. पर्यावरणाचा समतोल राहावा या संकल्पनेतून नववधुनी आपल्या माहेरी दिलेला वृक्ष सासरी लावून पर्यावरणासाठी हातभार लावावा . ग्रामपंचायत टांगा नी दिलेलं वृक्ष हे नेहमी त्या नववधूच्या आठवणीत राहावं. म्हणून ही योजना टांगा ग्रामपंचायतीने सुरू केली आहे . लग्नकार्याप्रसंगी ग्रामपंचायत टांगा तर्फे आयुष्यभर हे कार्य स्मरणात असावे , यासाठी स्मृतिचिन्ह , माहेरची साडी व वृक्ष भेट देण्यात आले . यावेळी ग्रामपंचायत टांगा च्या सरपंच लक्ष्मी लुटे , उपसरपंच ईश्वरदयाल बोंद्रे , ग्रा.प.सदस्या बबिता ईडपाते, मनीषा गिऱ्हेपुंजे , बेबीनंदा गिरेपुंजे, गीता गिरेपुंजे , देवदास गिरेपुंजे , रजत हटवार , अक्षय गिरेपुंजे , प्रवीण लुटे , विजय भाजीपाले आणि वधूंचे आई वडील व वरांचे आई वडील व समस्त वऱ्हाडी उपस्थित होते.

# विषारी औषध प्राषन केल्याने मृत्यू

**लाखांदूर :** प्रकरण अषा प्रकारे आहे कि,यातील मृतक बाळकृष्ण आत्माराम अलोने वय ७१ वर्ष , रा. सोनी ता. लाखांदुर जि. भंडारा याने दि. २१/ ०३/ २०२५ चे अंदाजे ०७/०० वा. सुमारास कोणतेतरी विषारी औषध प्राषन केल्याने त्याची प्रकृती बिघडल्यामुळे त्यास प्राथमिक उपचाराकामी ग्रा. रु.लाखांदुर नंतर सरकारी रुग्णालय भंडारा येथे दि. २१/०३/२०२५ रोजी ११/३० वा. आय. सी. यु मध्ये भरती केले असता तो उपचारादरम्यान दि.२२/०३/२०२५ रोजीचे ०५/२५ वा. एम ओ सा. यांनी तपासुन मृत घोषीत केल्याने पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/२०२५ कलम १९४ भा. ना. सु. सं. अन्वये दाखल असुन त्याचे जा.क्र. ११/२५ पो.स्टे. भंडारा अन्वये आज दि.२२/०३/२०२५ ला मृतकाचे संपुर्ण कागदपत्रे पो.स्टे. लाखांदुर अन्वये प्राप्त झाल्याने मा. पो.नि. सा. यांचे आदेषान्वये पो.स्टे.लाखांदुर येथे कलम १९४ ठछै अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पो.स्टे. लाखांदुर

# पक्षांसाठी केली पाणी आणि अन्नाची सोय



**महासागर प्रतिनिधी**

**जांब (लोहारा) :** उन्हाळ्याचे दिवस चालू झाले आहेत आणि आणि मार्च महिन्यातच तापमानाचा पारा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. तलाव, विहिरी,कोरड्या पडण्याच्या मार्गावर आले आहेत.हयातच माणूस आपल्या पाण्याची सोय स्वतःच करतो.परंतु पक्षांचं काय?

उन्हाळ्याच्या दिवसात पक्षांना पाणी व अन्न मिळत नाही त्यामुळे शेकडो पक्षी मृत्यूमुखी पडतात. पक्षांना पाण्याची व अन्नाची सोय व्हावी या करीता 'राजमुद्रा फाउंडेशन जांब' यांनी पुढाकार घेतला. खाली तेलाच्या पिप्या पासून. पक्षानं साठी अन्न व पाणी टाकत येईल असा साहित्य बनविला व जिल्हा परिषद हायस्कूल जांब व केंद्रिय प्राथमिक शाळा जांब येथे ठीक ठिकाणी लावण्यात आले.त्यावेळी हायस्कूल चे मुख्याध्यापक बोळणे ,सिध्देश्वर मुंडे , गोळांगे ,अमर पंधरे तसेच केंद्रीय प्राथमिक शाळेतील शाळा समितीचे अध्यक्ष शेखर उताणे, मुख्याध्यापिका होळांबे मॅडम, लिल्हारे मॅडम, खंडाळे मॅडम त्या वेळी उपस्थित होते. व शालेय विद्यार्थी सुध्दा उपस्थित होते.राजमुद्रा फाउंडेशनचे सदस्य मयुर कुथे यांनी शालेय विद्यार्थ्यांना पाण्याची गरज व शाळकरी मुलांनी पक्षानं साठी घरी एखादया वाटी मधे पाणी ठेवावे असे आवाहन व मार्गदर्शन केले.त्यावेळी राजमुद्रा फाउंडेशनचे पंकज सेलोकर, रोहीत मरकाम,आयुष बोरकर, समीर सिंदपुरे,भानू सारोते, मयुर कुथे, साहिल मोहनकर,तेजस मरकाम आदी उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची जिल्हा कार्यकारिणी जाहीर.

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंतरावजी पाटील यांचे आदेशानुसार विदर्भाचे नेते अनिलजी देशमुख यांचे मार्गदर्शनात भंडारा जिल्ह्याचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष माजी आ. चरणभाऊ वाघमारे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे जिल्हा कार्यकारिणी जाहीर केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा कार्यकारीणी घोषीत करतांना जिल्हा उपाध्यक्षपदी राजेशजी पटले, राजुभाऊ रेवतकर, अनील जिभकाटे, प्रमोद घरडे, नरहरी वरकडे, तसेच उर्मिलाताई आगासे यांची तर सरचिटणीसपदी मुनेश्वरजी काटेखाये, ललीत शुक्ला, विनोद वटी, हिरालाल रोटके , जिल्हा प्रसिद्धी प्रमुख हरिश्चंद्र बंधाटे तर नियोजनप्रमुख बालचंद पाटील यांची जिल्हा सचिव पदाची जबाबदारी डॉ जितेंद्रजी तुरकर, के बी चौरागडे, मेहताबशिंगजी ठाकूर, अजय मेश्राम आणि अरविंदजी राऊत सहसाचिवपदी कृष्णा बनकर तर कार्यकारिणी सदस्य म्हणून रामुजी कटरे यांची नियुक्ती करण्यात आली असून जिल्हा कार्यकारिणी कायम निमंत्रित सदस्य म्हणून विलासजी बडवाईक , विजयजी नवखरे व सहादेवजी तूरकर यांना स्थान देण्यात आले आहे.सोबतच मोहाडी तालुका अध्यक्षपदी हंसराज आगासे, शहरप्रमुख अनील न्यायखोर, भंडारा तालुका अध्यक्षपदी अनिल सार्वे तर शहरप्रमुख मधुकरजी चौधरी, तुमसर तालुका अध्यक्षपदी राजेंद्र तुरकर तर शहरप्रमुख हेमराज नागफासे , लाखनी तालुका अध्यक्षपदी संजय खंडाईत शहरप्रमुख सुधिरजी गिरीपुंजे, पवनी तालुका अध्यक्षपदी कुनालजी पवार शहरप्रमुख योगेशजी सेलोकर, साकोली तालुका अध्यक्षपदी भाष्कर हटवार, लाखांदूर तालुका अध्यक्षपदी रतन थाटकर आणि लाखांदूर शहर प्रमुखपदी विजय जाधव यांची निवड करण्यात आली आहे.कार्यकारिणी जाहीर करताना जिल्हाध्यक्ष माजी आमदार चरण वाघमारे यांनी शुभेच्छा देत सर्वांनी जिल्ह्यात पक्षसंगठण बळकटीसाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आवाहन केले आहे.

# महालगाव मार्गावर जीवघेणा खड्डा :वाहने शेतात कोसळण्याची भीती

## देखभाल दुरुस्तीच्या नावावर कंत्राटदारांची हुलकावणी

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा :** गोंडीटोला ते महालगाव या ३ किमी अंतराच्या मार्गाचे डांबरीकरण करण्यात आले. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या अटी व शर्तीला अधीन राहून कंत्राटदाराने ही कामे केली.

पाच वर्षांत मार्गाचे देखभाल आणि दुरुस्तीला कंत्राटदार करारबद्ध होते. परंतु अलीकडे कंत्राटदारांनी हुलकावणी दिली आहे.

याच मार्गांवरील खड्डा आता चारचाकी आणि दुचाकी वाहनाला जीवघेणा ठरणारा झाला आहे. शेतात वाहने कधी कोसळतील याचा नेम नाही. यामुळे गावकऱ्यात संताप निर्माण झाला आहे.

मार्गाची देखभाल आणि दुरुस्तीला ५ वर्षे जबाबदार धरण्यात आले आहे. परंतु देखभाल आणि दुरुस्तीच्या कामासाठी कधी कंत्राटदार फिरकले नाहीत. या मार्गावर पंचायत समिती सदस्य कांचनलाल कटरे यांच्या शेताच्या शेजारी जीवघेणा खड्डा तयार झाला आहे.

शेताच्या शिवारात मार्गात पाईप घातले होते. पाईप खचला आहे. चारचाकी आणि दुचाकी वाहने चालवताना धोक्याचे झाले आहे. या मार्गावर अद्याप देखभाल आणि दुरुस्ती झाली नाही. फक्त फलकावर देखभाल आणि दुरुस्तीची नोंद करण्यात आली आहे. परिसरात सुकळी नकुल ते चुल्हाड मार्गाची हीच अवस्था झाली आहे.

गोंडीटोला ते मालगाव मार्गावर जागोजागी खड्डे पडले आहेत. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या कामांना कंत्राटदारांनी हरताळ फासला आहे. नियम आणि अटी, शर्ती धाब्यावर बसविण्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाची यंत्रणा या मार्गाची पाहणी करीत नसल्याने गावकरी चांगलेच वैतागले आहेत.

## दिलेला शब्द कधी पाळणार

महालगाव ते नाकाडोंगरी या १८ किमी मार्गाचे डांबरीकरण करण्यात आले नाही. मार्गाचे डांबरीकरण करण्यासाठी राष्ट्रीय महामार्गावर आंदोलन झाले होते.

मार्गाचे सिमेंटीकरण करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. या मार्गावर वाहनाची वर्दळ राहत आहे.

६ गावे याच मार्गावर असून मध्यप्रदेश राज्याला जोडणारा मार्ग आहे. परंतु मार्गाच्या दुरुस्तीकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात येत आहे. पुन्हा गावकरी आंदोलनाच्या तयारीत आहेत.

## ३ किमी मार्गाचे डांबरीकरण

गोंडीटोला ते महालगाव या ३ किमी अंतराच्या मार्गाचे डांबरीकरण बांधकाम झाल्यानंतर त्या मार्गाची देखभाल दुरूस्ती करण्याचे ठरले होते. मात्र रस्ता बांधकामानंतर रस्त्यावर खड्डे पडले तरी कोणतेही अधिकारी किंवा कंत्राटदार यांनी रस्ता दुरूस्तीचे सौजन्य दाखविले नाही. परिणामी नागरिकांत संताप व्याप्त आहे.

# लाखांदूरात २२ हजार २०४ रेशन लाभार्थ्यांची केवायसी शिल्लक.

## मुदतीमध्ये करून घेण्याचे आवाहन

**लाखांदूर :** अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागा अंतर्गत जिल्हा आणि तालुका अन्न पुरवठा कार्यालयाच्या माध्यमातून प्रत्येक गावात रेशन दुकानातून मोफत अन्न धान्य वितरित केले जातात. त्याचा लाखो कुटुंब आणि त्यातील युनिट फायदा घेत आहेत. मात्र, पुढेही याचा लाभ घेण्यासाठी इ - केवायसी करण्याची सक्ती शासन स्थातावरून केली जात असून, त्याची अंमलबजावणी सद्या सुरू आहे. दरम्यान बहुतांश रेशन कार्ड धारक आणि त्यातील इतर युनिट यांनी आपली इ - केवायसी करून घेतली असली तरी अद्याप लाखांदूर तालुक्यातील २२ हजार २०४ रेशन लाभार्थी युनिटची केवायसी अजून शिल्लक आहे.

लाखांदूर तालुक्यातील ही आकडेवारी १२ मार्च पर्यंतची असून यात काही वृद्धी झाली असू शकते. ही केवायसी करून घेण्याची अंतिम मुदत ३१ मार्च पर्यंत असून विहित मुदतीत लाभार्थी युनिट ने आपली केवायसी करून घेण्याचे आवाहन अन्न पुरवठा विभागातर्फे करण्यात येत आहे. मुदती नंतर जे लाभार्थी आपली केवायसी करून घेणार नाही त्यांचे रेशन आपोआप कमी होणार असल्याची माहिती अन्न पुरवठा विभागाकडून मिळाली आहे.

> **अन्यथा कमी होणार रेशन..!**
>
> रेशन कार्ड वर नाव असलेल्या लाभार्थ्यांपैकी ज्या लाभार्थ्यांचे इ - केवायसी झाले नसेल अश्या लाभार्थ्यांचे रेशन कमी होणार आहेत. त्यामुळे, सर्वांनी आपले इ - केवायसी करून घ्यावे. तसेच रेशन कार्ड वर नाव असलेल्या लाभार्थ्यांपैकी जे व्यक्ती मृत झाले असतील त्यांचे नाव स्वतः अन्नपुरवठा विभागात जाऊन कमी करून घेण्याचे आवाहन अन्न पुरवठा विभागातर्फे करण्यात आले आहे.
>
> **तर बंद होऊ शकतो कार्ड..!**
>
> कोनत्याही रेशन कार्ड वरील कुटुंब प्रमुख मृत झाले असल्यास ते रेशन कार्ड आपोआप बंद होणार आहेत. त्यामुळे, ज्या रेशन कार्डातील कुटुंबातील प्रमुख मृत पावले असतील अश्या रेशन कार्ड धारकांनी आवश्यक कागज पत्रांसोबत तालुका अन्न पुरवठा विभागात जाऊन मृत व्यक्तीचे नाव कमी करून घ्यावे. सोबतच मृत व्यक्तीच्या जागी रेशन कार्डवर कुटुंबातील इतर व्यक्तीला कुटुंब प्रमुख बनवून घ्यावे. असे न केल्यास ३१ मार्च नंतर ते रेशन कार्ड आपोआप बंद होणार.

> **लाखांदूर तालुक्याची आकडेवारी**
>
> ***अंतोदय रेशन कार्ड - ६९७८ *प्राधान्य कुटुंब रेशन कार्ड - २०४२७ *एकूण रेशन कार्ड - २७४०५ *अंतोदाय युनिट - २५१८९ *प्राधान्य कुटुंब युनिट - ८४५६३ एकूण युनिट - १०९८४२ केवायसी पूर्ण झालेले युनिट - ८७६३८ (७९.७८टक्के) केवायसी शिल्लक असलेले युनिट - २२२०४(२०.२१टक्के)***

# ग्रामपंचायत संगणक परिचालकांचे काय ?

## सरकार मायबाप मानधन देताय का भीक ?

**महासागर प्रतिनिधी**

**किन्ही / मोखे :** राज्यात चौदा वर्षे ग्रामपंचायत स्तरावर काम करणारे संगणक परिचालक आता शासनापुढे हतबल झालेली दिसतात.गेली सहा महिन्यांपासून या संगणक परिचालकांचा मानधन मिळालेला नाही.संग्राम प्रकल्प आणि आता आपले सरकार सेवा केंद्रांची धुरा ज्यांच्या खांद्यांवर आहे त्यांनाच शासन पूर्णपणे बेजार करून सोडण्याच्या मनस्थितीत असल्याचे चित्र महाराष्ट्रात दिसते. उलट याच धर्तीवर अतिरिक्त सेवा केंद्र शासन स्थापित करण्याचे शासन निर्णय निर्गमित करतोय,यामुळे शंका आहे की शासनाचे डोके ठिकाणावर आहे काय ? शेतकरी,कष्टकरी, कामगार, गोरगरीब यांची मुले असलेल्या या संगणक परिचालकांची ऐकायला कुणी वालीच नाही.चौदा वर्षापासून हा संगणक परिचालक १ ते ३३ नमुने ऑनलाइन करतोय, ग्रामपंचायत स्तरावरील वित्त आयोगाचा लेखा जोखा ऑनलाइन ठेवतो.ग्रामपंचायत स्तरावरील वित्त आयोग अंतर्गत सर्व कामांचे पेमेंट करणे हेसुध्दा काम करतो,सर्व प्रकारचे दाखले व इतर सोया गावातील गल्ली बोळातील माणसापर्यंत पोहोचवतो.

कोविड महामारीच्या काळात आरोग्य विभागाच्या खांद्याला खांदा लावून ग्राम स्तरावर आपला खारीचा वाटा उचलला.ग्रामविकास विभाग, महसूल विभाग,आरोग्य विभाग आणि इतर विभाग सर्व ऑनलाइन व अंशतः ऑफलाईन कामे या संगणक परिचालक यांच्याकडून शासन करवून घेतो.

शासनाने या सर्व कामांचा मोबदला म्हणून ग्रामपंचायत स्तरावरून पंधरावा वित्त आयोग अंतर्गत दरमहा दहा हजार मानधन वर्षाच्या सुरूवातील जिल्हा परिषदांकडे वर्ग करतो व आर जी एस ए या सर्वांचे मानधन देतो.परंतु ग्रामपंचायती सर्व मानधन देऊन सुद्धा मानधन सहा सहा महिने संगणक परिचालकांना मिळत नाही. संगणक परिचालकाला शासनाने गाव पातळीवरील उद्योजक ठ्ठॅ असे गोंडस नाव दिलेले असून यांच्याकडून दर वर्षाला टी डी एस कपात करतो.ग्रामपंचायतीचे कामच दिवसभर संपत नाहीत दर महा दहा हजार असणारी संगणक परिचालक म्हणे कर दाता आहेत.चौदा वर्षे काम करून सुद्धा शासन संगणक परीलकांना उपरा असल्याचे वेळो वेळी जाणवून देतो.

आजच्या महागाईच्या काळात फक्त दहा हजार रुपये मानधन आणि ग्रामस्तरावरील सर्व ऑनलाइन कामे करणारा हा संगणक परिचालक कसा काय जगू शकतो याची कल्पना शासन करत नाही काय ? ही पण हाडं मास असलेली माणसं नाहीत काय ? किती दिवस अशाच पद्धतीची पिळवणूक संगणक परिचालकांची होत राहील ? संगणक परिचालकांना आरोग्य विमा नाही किंवा बोनस नाही,महिलांकरिता प्रसुती रजा सुध्दा नाहीच.यांच्या सेवेच्या मोबदल्यात यांना कोणत्याही प्रकारची तरतूद शासनाकडून नाही.या सर्व संगणक परिचालकांची मागणी एकच आहे कर्मचारी दर्जा आणि किमान वेतन,यासाठी वेळो वेळी संघटनेच्या वतीने आंदोलने, मोर्चे,आणि पाठपुरावा करीत असते.परंतु शासनाचे धोरण नेहमी उदासीन दिसते.यामुळे आता पुन्हा एकदा संगणक परिचालक काम बंद च्या बाजूने बोलत आहेत.पुन्हा एकदा सर्व संगणक परिचालक म्हणताहेत सरकार आमच काय? माजी मुख्यमंत्री शिंदे साहेबांनी तरतूद केलेले ३३६ कोटी कुठे गेलेत ? संगणक परिचालकांसमोर असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

# अभिवादन झाले; धोरणे कुठे आहेत?

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, विश्वविभूती, महामानव, महाकारुणिक, बोधिसत्त्व अशा नानविध विशेषणांनी बाबासाहेबांची ओळख विश्वपटलावर अधोरेखित झाली आहे. आज वैश्विक स्तरावर डॉ. आंबेडकरांच्या विचारांना मानवकेंद्रित सर्वसमावेशी समतामूलक शाश्वत विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी चिरंतन प्रेरणा म्हणून स्वीकारले जाते आहे. परंतु भारतातील आजची सामाजिक-आर्थिक विषम विदारक परिस्थिती ध्यानात घेता डॉ. आंबेडकरांनी २६ नोव्हेंबर १९४९ मध्ये संविधानसभेतील भाषणात जी खंत व्यक्त केली होती त्यावर विश्वगुरू, विकसित भारत आदी स्वप्ने साकार करू पाहणाऱ्या केंद्रातील सत्ताधारी पक्षाला आत्मचिंतन करण्याची गरज आहे. डॉ. आंबेडकरांनी या भाषणात, आपण एक मत-एक मूल्य हे तत्त्व स्वीकारून जरी राजकीय लोकशाही प्रस्थापित केली तरी, आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मात्र, सामाजिक आणि आर्थिक संरचनेमुळे, प्रत्येक माणसाला समान मूल्य हे तत्त्व आपण नाकारत राहणार आहोत. अशा परस्परविरोधी जीवनात आपण आणखी किती काळ राहणार आहोत? असा सवाल केला होता.

---

■ डॉ. सुधीर म्हस्के

---

आज राजकीय लोकशाही असूनही ती सामजिक आणि आर्थिक क्षेत्रात प्रवर्तित न झाल्यामुळे आपणास आभासी लोकशाहीची प्रचीती अनेकदा येते. गरिबी, भूकबळी, लोकशाही शासनप्रणालीत एकाधिकारशाहीकडे वाढता राजकीय प्रवाह, धार्मिक सांस्कृतिक बहुसंख्यावाद, मूलतत्त्ववाद त्यातून फोफावत असलेल्या हिंसक प्रवृत्ती आणि याच्या मुळाशी असलेली विषमतावादी मानसिकता हे आजचे सामाजिक-आर्थिक प्रश्न आहेत.

त्यांना भिडण्यासाठी डॉ. आंबेडकरांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व, विचार आणि मानवकेंद्रित विकासाचे तत्त्वज्ञान विचारात घेऊनच केंद्रातील संघप्रणीत भाजप सरकारला भविष्यातील ध्येय, नीती, धोरणे ठरवावी लागतील. एकविसाव्या शतकातील उत्तर आधुनिक युगात वैश्विक स्तरावर शांती, न्याय, मानवाधिकार या मूल्यांच्या आधारावर सर्वसमावेशक शाश्वत विकासाचे ध्येय गठण्यासाठी आंबेडकरवाद हाच एक उत्तम पर्याय म्हणून पाहिले जात आहे. आज वैश्विक स्तरावर अनेक ठिकाणी डॉ. आंबेडकरांच्या नावे ग्रंथालयाची उभारणी, अनेक आंतरराष्ट्रीय विद्यापीठांत डॉ. आंबेडकरांच्या नावाने सुरू होत असलेली अध्ययन केंद्रे ही आंबेडकरांच्या विचारांना मिळत असलेल्या मान्यतेची प्रतीके आहेत.

आज झपाट्याने आर्थिक वृद्धी साधणारा देश म्हणून भारताचा बोलबाला असला तरी वर्ल्ड इनइक्वॅलिटी रिपोर्ट (२०२२) या अहवालानुसार भारत हे जगातील सर्वाधिक विषमतामूलक राष्ट्रांपैकी एक आहे. या अहवालानुसार १० टक्के श्रीमंत वर्गाच्या हातात जवळपास ६६ टक्के संपत्ती एकवटली गेली आहे.

भारतातील या १० टक्के श्रीमंतांकडे १९८० च्या दशकात ३० टक्केच संपत्तीचा वाटा होता, हे लक्षात घेतल्यास आधीच्या सत्ताधाऱ्यांवर खापर फोडण्याचीही सोय उरत नाही. मागील १० वर्षांत केवळ दोनच बलाढ्यउद्योगपतींच्या संपत्तीत दसपटीने वाढ झाली, याची आकडेवारी आहेच.

या ताज्या (२०२३-२४) आकडेवारीनुसार भारतातील सरासरी उत्पन्न वर्षाला २,३०,००० रुपये (म्हणजे महिना २० हजार रु. हून कमी) आहे, पण याच भारतात फक्त दहा हजार धनिक असे आहेत की, ज्यांचे वार्षिक उत्पन्न ४८ कोटी रु. (महिना चार कोटी रु.- म्हणजे सरासरीपेक्षा २०६९ पटीने जास्त) आहे.

बेरोजगारीचे वाढते प्रमाण, पायाभूत सुविधांचा अभाव, शिक्षण, आरोग्य या सार्वजनिक क्षेत्रातील सेवासुविधांचे वाढते खासगीकरण यांमुळे देशातील दलित, आदिवासी, अल्पसंख्याक, अतिमागास वंचित समूह दारिद्र्याच्या खाईत लोटले जात आहेत.

सबका साथ, सबका विकास और सबका विश्वास हा नारा २०१९ सालीच केंद्रातील सरकारने दिला; पण उजव्या विचारसरणीच्या धोरणामुळे जातीय उतरंडीतील उच्चवर्णीय जातिसमूहाकडे सत्ताकेंद्रे एकवटत असल्याचे वास्तव नाकारता येणारे नाही.



अनेक शासकीय, निमशासकीय आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील संस्थांचे नेतृत्व कथित उच्च जातीकडे एकवटले गेल्यामुळे दलित, आदिवासी, अल्पसंख्याक समुदायातील व्यक्तींना संधीच्या समानतेपासून वंचित ठेवले जात आहे.

जागतिक भूक निर्देशांक (ग्लोबल हंगर इंडेक्स) अहवालानुसार, भारत १२७ देशांपैकी १०५व्या स्थानावर आहे. या अहवालानुसार अल्पपोषण श्रेणीतील (१३.७) टक्के लोकांना आवश्यकतेपेक्षा कमी कॅलरी मिळतात.

पाच वर्षांखालील (३५.५) टक्के मुले वयाच्या तुलनेत उंचीने खुरटलेली आहेत; तर १८.७ टक्के मुले त्यांच्या उंचीच्या तुलनेत वजनाने कमी आहेत- हा दर जगातील सर्वाधिक आहे. भारतात २०२४ मध्ये पाच वर्षांखालील बालकांचा मृत्युदर २.९ टक्के आहे- मग निव्वळ डॉ. आंबेडकर जयंतीदिनी संधी आणि प्रतिष्ठा दिल्याच्या जाहिराती करून काय साधणार?

**हक्काचे शिक्षण कुठे आहे?**

डॉ. आंबेडकर सर्वांना मोफत व सक्तीचे शिक्षण यासाठी नेहमी आग्रही होते. भारतीय संविधानात शिक्षणाचा हक्क आधी राज्यसंस्थेच्या धोरणांचे मार्गदर्शक तत्त्व म्हणून आला; पण पुढे २००३ मध्ये ८६ व्या घटनादुरुस्तीनुसार अनुच्छेद २१(अ) मध्ये ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत प्राथमिक शिक्षणाची हमी मूलभूत हक्क या स्वरूपात मिळाली.

याला २१ वर्षे उलटूनही आज विशेषतः ग्रामीण भागात सरकारी शाळांची परिस्थिती विदारकच दिसते. शाळांमध्ये वर्गखोल्याची कमतरता, पिण्याच्या पाण्याचा आभाव, शिक्षकांची कमतरता, आदी प्रश्नांनी आधीच ग्रासलेल्या या शाळा समायोजन किंवा तत्सम नावाखाली बंद केल्या जात आहेत. या शाळांत शिकणारी दलित, आदिवासी, अल्पसंख्याक, मागासवर्गीय मुले गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या समान संधीपासून वंचित राहिल्यामुळे उच्च शिक्षणातील गळतीचे प्रमाणदेखील या वर्गामध्ये सर्वाधिक आहे आणि बेरोजगार युवकांची संख्यादेखील याच प्रवर्गात सर्वाधिक दिसते.

देशातील अनेक उच्च शिक्षण संस्थांमध्ये दलित, आदिवासी समूहातील विद्यार्थ्यांशी उच्चवर्णीय विद्यार्थी वा प्राध्यापकांडून भेदभाव, छळवणूक होत असल्याच्या घटना वारंवार घडत आहेत. अनेक विद्यापीठांमध्ये एससी, एसटी, ओबीसी प्रवर्गातील उमेदवारांना गुणवत्ता असूनही नियुक्तीच्या वेळी जाणीवपूर्वक अपात्र केले जात आहे.

यातूनच गेल्या भारतीय लोकशाहीचा निर्देशांक झपाट्याने उणावतो आहे. व्ही-डेमच्या अहवालानुसार २०१२ ते २०२२ या दरम्यान भारताचा उदारमतवादी लोकशाहीचा निदेशांक (लिबरल डेमॉक्रसी इंडेक्स) ०.५४ वरून ०.३१ पर्यंत खालावला; तर सहभागिता निदेशांक (पार्टिसिपेटरी डेमॉक्रसी इंडेक्स) ०.४५ वरून ०.२६ पर्यंत खाली आला.

अशा स्वरूपाची घसरण होणे राष्ट्रासाठी चिंतेची बाब आहे. यातून सावरण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी मांडलेला आधुनिक लोकशाहीचा सर्वंकष विचार आणि भारतीय राज्यघटनेच्या मूल्यांनुसार कार्य करत राहणे हेच खरे अभिवादन ठरू शकते.

भारतातील जातीवर आधारित सामाजिक संरचना ही मानवनिर्मित भेदभाव आणि विषमतेवर आधारित असल्याचा समाजशास्त्रीय सिद्धान्त डॉ. आंबेडकरांनी सर्वप्रथम मांडला. ब्राह्मिनिकल धर्माने स्वहित आणि वर्चस्व प्रस्थापित करण्यसाठी जातीय उतरंडीची व्यवस्था निर्माण केली. भारतात सर्वप्रथम तथागत गौतम बुद्धाने या उतरंडीला आव्हान दिले.

मानवी उन्नयानासाठी प्रत्येक व्यक्ती आणि समूहाला ज्ञान अर्जित करण्याचा एकसमान हक्क असला पाहिजे हा विचार मांडला. त्यामुळे डॉ. आंबेडकर क्रांती आणि प्रतिक्रांती या पुस्तकात लिहितात की भारताचा इतिहास हा बुद्धिझम विरुद्ध ब्राह्मिनिझम असाच राहिला आहे.

डॉ. आंबेडकरांच्या विचारला बुद्धविचाराचे भक्कम अधिष्ठान आहे. पुंजीवादावर आधारित भौतिक विकासाचे प्रारूप चिरकाळ टिकणार नाही. त्यासाठी बुद्धाचा मध्यममार्ग हाच पर्यायी मार्ग म्हणून स्वीकारावा लागेल. मी प्रथमतः आणि अंतिमतः भारतीय हे डॉ. आंबेडकरांचे विधान आठवतानाच आधुनिक विचारला समर्पक असे बुद्धाचे गाडले गेलेले सकल मानव कल्याणासाठीचे शांती, बंधुता आणि मैत्रीभाव हे तत्त्वज्ञान डॉ. आंबेडकरांनी पुनरुज्जीवित केल्याचे विसरता येणार नाही.

भवतु सब्ब मंगलम्, बहुजन हिताय, बहुजन सुखाय हे बुद्धविचाराचे सार राजकीय, प्रशासकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक क्षेत्रात रुजले, तरच लोकशाही ही आमची जीवनप्रणाली आहे असे आपण म्हणू शकतो, हे आकलन बुद्ध आणि त्यांचा धम्म या १९५६ मधील पुस्तकातूनही होऊ शकते. त्यानुसार आचरण करण्यासाठी धोरणकर्त्यांना यासाठी घटनात्मक चौकट बदलावी लागणार नाही; कारण प्रबुद्ध भारताच्या निर्माणासाठी भारतीय संविधानातच स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्यायावर आधारित सार्वभौम प्रजासत्ताक राष्ट्राची संकल्पना डॉ. आंबेडकरांच्या योगदानाने साकारलेली आहे.

कल्याणकरी राज्याच्या संकल्पनेतूनच सामाजिक न्यायाच्या सिद्धान्तावर आधारित समतामूलक राष्ट्राचे निर्माण केले जाऊ शकते, हा डॉ. आंबेडकरांनी मांडलेला मूलभूत विचार प्रबुद्ध भारताच्या निमार्णासाठीचा दीपस्तंभ ठरू शकतो. पण आजचे धोरणकर्ते त्या दिशेने वाटचाल करणार की निव्वळ जयंती/महापरिनिर्वाणदिनी महामानवाला अभिवादनाचे सोहळे करणार, हे पाहावे लागेल.

---

**(लेखक दिल्ली विद्यापीठाच्या सामाजिक कार्य विभागात सहयोगी प्राध्यापक आहेत.)**
sudhir.dssw@gmail.com

●●●●●

# इंग्रजी शाळेची क्रेझ, गुणवत्ता आणि भविष्य

शिक्षणाने माणूस जागृत होतो हे फक्त पुस्तकात वाचायलाच छान वाटतं. वास्तवात शिकलेले लोक जागृत आहेतच असे दिसुन येत नाही. जागृती या विषयावर लिहायचेच झाले तर खुप गहन विषय आहे. परंतु एकाच उदाहरणाने आपण समजून घेऊ.

आज सुशिक्षित व नोकरदार वर्ग किती जागृत आहे. संविधान कलम क्रमांक २१ अ जे मुलभूत अधिकारात येते त्यानुसार वय ६ वर्षे ते १४ वर्षे पर्यंत प्राथमिक शिक्षण हे मोफत व सक्तीचे आहे आणि ते सरकारला द्यावेच वागते.

असे असतानाही आपण बघितले तर सुशिक्षित लोक, नोकरदार लोक आपले मुलं खाजगी शाळेत हजारो रुपये फी भरून टाकतात. जेथे शिक्षणाची मोफत व सक्तीची तरतूद असताना पुर्वप्राथमिक अर्थात बालवाडीचे शिक्षणही हजारो रुपए देऊन आज लोक घेत आहेत.



**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव, ता. मेहकर**
**९१३०९७९३००**

सुशिक्षित आणि नोकरदार वर्ग आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत टाकत असल्याने कमी शिकलेले आणि गरिब लोक सुद्धां आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत टाकत आहेत. याचे कारण आहे नोकरदार, श्रीमंत व सुशिक्षित लोक जर इंग्रजी शाळेत मुलांना टाकतात त्यांचेच अनुकरण अल्पशिक्षित व गरिब पालकवर्गही करतात आणि आर्थिक कुवत नसताना देखील ते केवळ मोठेपणा साठी आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत टाकतात.

**पूर्वार्ध**

इंग्रजी शाळेत टाकायला थोडाही विरोध नाही पण शासकीय शाळेत, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका येथे सुद्धां इंग्रजी माध्यमातून शिकवण्यात येते तरीही लोक खाजगी शाळेकडे वळ्ले कारण इंग्रजी खाजगी शाळेचा क्रेझ निर्माण झाला. शिकलेल्या व श्रीमंत लोकांची मुलं शाळेत जाऊ शकतात तर आपण कुठे कमी आहोत या अविभार्वात गरिबही मोफत असलेले शिक्षण विकत घेतो ही शोकांतिका आहे.

इंग्रजी शाळेत टाकलेल्या विद्यार्थ्यांना खरंच इंग्रजी बोलता येते का? याचा विचार कधी केला का? जेथे हजारो, लाखों रुपये आपण इंग्रजी शाळेवर खर्च करत आहोत. एवढा खर्च करूनही मुलं इंग्रजी बोलु शकत नसतील तर एवढा खर्च करून नेमका काय फायदा? शेतकऱ्यांचा दहा विस रुपयांचा भाजीपाला घेताना भाव करणारे लोक लाखों रुपयाचा चुराडा करत असतील त्यातून काहीच साध्य होत नसेल तर खर्च कशासाठी?

श्रीमंतांना, नोकरदारांना हे परवडणारही परंतु गरीबांचे काय? मेहनत करून, वेळप्रसंगी व्याजाने, घरातील काही वस्तु विकुन शाळेची फी भरायची आणि मुलांना इंग्रजी बोलताही येत नसेल तर इंग्रजी शाळेत टाकण्याचा उद्देश साध्य झाला का? यावर मात्र कोणीही चर्चा वा विचार करायला तयार नाही. हे खुप भंयकर आहे. लाखोंचा रुपये खर्चून जर गुणवत्ता मिळत नसेल तर स्वतःच्या खर्चाने स्वतःच्या मुलांच्या जिवनात अंधार करण्यात कोणते शहाणपण आहे?

बरेच पालक लेकराचे कौतुक करताना म्हणतात आमच्या लेकराला इंग्रजी शाळेत टाकले तर त्याला मराठी मधून काहीच समजत नाही. सर्व इंग्रजी मधुनच पाहिजे. अर्थात असे बोलणे हेच लेकराच्या उधोगतीचे कारण आहे. कारण घरात आपण मराठी बोलतो. आणि लेकराला मराठी येत नसेल तर पालक व मुलं यांचात संवाद कसा होईल?

इंग्रजी शाळेत टाकणे म्हणजे मराठीवर दुर्लक्ष करणे आहे का? बरं इंग्रजी शाळेतील लेकरांना खरंच इंग्रजी समजते का? तर याचे उत्तर नाही कारण आम्ही जेव्हा इग्लिश मिडीयम च्या विद्यार्थ्यांना बोलतो, शिकवतो तेव्हा लक्षात येते कि त्यांना फक्त मे आय गो टू वाशरुम, मे आय कम इन, वन, टू, थ्री, प्लस, मायनस, डिवाइड येवढच येते. सात विचारले तर म्हणतात मराठी नाही समजत इंग्रजी मध्ये विचारा.

सेव्हन ला मराठी मध्ये काय म्हणतात किंवा डिवाइड, प्लस, मायनस याला मराठीत काय म्हणतात हेच जर कळत नसेल तर खरचं ती.गुणवत्ता आहे का? वन टु बोलणे, किंवा विषयांचे नाव इंग्रजी मध्ये बोलणे म्हणजे इंग्रजी बोलता येते किंवा समजते असे मुळीच नाही. इग्लिश मिडीयम ला जाणाऱ्या मुलांना खरचं इग्लिश बोलता येते का हे तपासायचे तर दोन मिनिटे चार मिनिटे इंग्रजी मध्ये बोलता आले पाहिजे. आणि पुस्तकातील कविताच नाही तर दैनंदिन व्यवहारातील संभाषण करता आले पाहिजे तर इग्लिश मिडीयमला टाकून फायदा होईल.

इंग्रजी माध्यमातून शिकणाऱ्या बऱ्याच विद्यार्थ्यांच्या पालकांना इग्लिश बोलता येत नाही. त्यांनाच बोलता येत नाही तर ते आपल्या मुलाला इग्लिश जमते की नाही याची पडताळणी कशी करणार? फक्त पुस्तकातील पाहून लिहिणे म्हणजे पाल्य हुशार आहे असा अर्थ होतो का? म्हणून पालकांची सुद्धां जबाबदारी आहे.

जर आपला मुलगा मुलगी इग्लिश शाळेत सातवी पर्यंत आहे किंवा आपण इग्लिश शाळेत टाकणार आहात तर अगोदर पालकांनी इग्लिश बोलायला शिकले पाहिजे. पालकांनी इग्लिश बोलायला शिकली तर मुलांना आपोआपच येईल. आणि मुलांना इग्लिश बोलता आले म्हणजे आपले लाखो रुपयांची बचत झालीच म्हणून समजा. पण पालकांना इग्लिश येत नाही आणि मुल महागड्या इग्लिश शाळेत जात असतील तर पैशा व्यर्थ जाण्याची शक्यता जास्त असते. याचा अर्थ ज्या पालकांना इग्लिश येत नाही त्यांनी आपली मुल इग्लिश शाळेत शिकवायचीच नाही का?

तर नक्कीच शिकवायची, परंतु हजारों लाखो रुपये खर्च करण्याची गरज नाही. जिल्हा परिषद शाळेतही इंग्रजी माध्यम आहे. तेथे शिकवू शकता आणि कमी खर्चात खाजगी शिकवणी लाऊन मुलांना इंग्रजी बोलायला शिकवू शकता. पण खाजगी शाळेत भरभक्कम फी भरून जर खाजगी शिकवणी लावावी लागत असेल तर आपण नेमका शाळेत पैसा भरतो कशाचा यावरही विचार विनिमय होणे आवश्यक आहे.

**(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)**

●●●●●

# बांगलादेशने मागितला माफीनामा!



**अभय गोखले**

बांगलादेश स्वातंत्र्य संग्रामात, पाकिस्तानी सैन्याकडून पूर्व पाकिस्तान मधील जनतेवर जे अनन्वित अत्याचार करण्यात आले, त्याबद्दल पाकिस्तानने माफी मागावी अशी मागणी बांगलादेश कडून यापूर्वी अनेक वेळा करण्यात आली, परंतु आजवर पाकिस्तानने माफी मागितलेली नाही.पंधरा वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर, बांगलादेश आणि पाकिस्तान यांच्या विदेश सचिवांमध्ये नुकतीच एक बैठक पार पडली.

या बैठकीत बांगलादेश कडून काही मागण्या करण्यात आल्या. त्यातील महत्त्वाची मागणी होती, ती म्हणजे पाकिस्तानी सैनिकांनी ऑपरेशन सर्च लाईट या मोहिमेत पूर्व पाकिस्तानातील जनतेवर जे भीषण अत्याचार केले, त्याबद्दल पाकिस्तानने बांगलादेशची माफी मागावी.

दुसरी मागणी अशी होती की बांगलादेश स्वतंत्र होण्यापूर्वी, पश्चिम पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तान यांची जी संयुक्त मालमत्ता होती, त्यातील बांगलादेशचा वाटा, जो अद्याप बांगलादेशला मिळालेला नाही तो बांगलादेशला मिळायला हवा. बांगलादेशने आपला हिस्सा म्हणून जी रक्कम मागितली आहे ती पाकिस्तानचे डोळे पांढरे करणारी आहे.

आपला हिस्सा म्हणून बांगलादेशने ४.५२ बिलीयन डॉलर्स इतकी प्रचंड रक्कम पाकिस्तानकडे मागितली आहे. सध्याची पाकिस्तानची आर्थिक दिवाळखोरी लक्षात घेता, पाकिस्तान ती मागणी मान्य करेल,असे बिलकुल वाटत नाही.

बांगलादेशची निर्मिती झाल्यानंतर तेथे जे पाकिस्तानी नागरिक अडकून पडले होते, त्यांना पाकिस्तानने परत घ्यावे अशी मागणी बांगलादेशकडून ताबडतोब करण्यात आली होती.परंतु पाकिस्तानने ती मागणी फेटाळून लावली होती. पाकिस्तानी सैनिकांनी जेंव्हा पूर्व पाकिस्तान मधील जनतेवर अत्याचार केले तेंव्हा या पाकिस्तानी नागरिकांनी पाकिस्तानी सैनिकांना नुसती मदतच केली नाही तर ते ही अत्याचारांत सामील झाले होते.बांगलादेश स्वतंत्र झाल्यानंतर तेथील नागरिकांनी या अत्याचारांचा बदला घेतला होता.

त्यामुळे भयभीत झालेल्या त्या पाकिस्तानी नागरिकांनी आम्हाला पाकिस्तानने परत घ्यावे अशी विनंती केली होती, परंतु पाकिस्तानने निर्दयपणे ती विनंती फेटाळून लावली होती.त्यानंतर बांगलादेश कडून अनेक वेळा ती मागणी करण्यात आली परंतु पाकिस्तानने तिकडे दुर्लक्ष केले.

बांगलादेश आणि पाकिस्तान यांच्या विदेश सचिवांमध्ये झालेल्या बैठकीत वरील मागण्या बांगलादेश कडून करण्यात आल्यानंतर, पाकिस्तानने त्यावर कोणतीही प्रतिक्रिया दिली नसून,ही चर्चा पुढे चालू ठेवण्यात यावी असे मोघम उत्तर दिले आहे.

पूर्व पाकिस्तानातील जनतेला शरण आणण्यासाठी, पाकिस्तानने ऑपरेशन सर्च लाईट या मोहिमेंतर्गत नरसंहार आरंभला होता, त्या बाबत थोडक्यात माहिती घेऊया. पूर्व पाकिस्तानमध्ये शेख मुजीबर रेहमान यांच्या असहकाराच्या आवाहनानंतर होणारे संभाव्य हिंसक आंदोलन आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न लक्षात घेऊन ते आंदोलन सुरू होण्यापूर्वीच त्याचा बंदोबस्त करण्याचा प्लॅन तत्कालीन पाकिस्तानी सत्ताधीश याह्याखान यांच्याकडे तयार होता.

त्या कारवाईला ऑपरेशन सर्च लाईट असे नाव देण्यात आले होते. बांगलादेश मधील आघाडीचे वृत्तपत्र ' द डेली स्टार ' मध्ये तकबीर हुडा यांनी रिमेंबरिंग द बार्बारिटीज ऑफ ऑपरेशन सर्च लाईट या लेखात २५ मार्च १९७१ रोजी सुरू झालेल्या ऑपरेशन सर्च लाईटमध्ये पाकिस्तानी सैन्याने पूर्व पाकिस्तानातील जनतेवर कसे अमानुष अत्याचार केले,त्याचे हृदय हेलावून टाकणारे वर्णन केले होते.

तकबीर हुडा यांनी लिहिले होते की, २५ मार्च १९७१ च्या काळरात्री पाकिस्तानी सैन्याने पूर्व पाकिस्तान मध्ये नरसंहाराला सुरुवात केली. त्या नरसंहारात एका रात्रीत त्या नराधमांनी सात हजार निःशस्त्र आणि निरपराध बंगाली नागरिकांना ठार मारले. हा नरसंहाराचा प्लॅन पाकिस्तानी लष्करी अधिकाऱ्यांनी २२ फेब्रुवारी १९७१ रोजी तयार केला होता. त्या प्लॅन नुसार अवामी लीग आणि त्यांच्या पाठीराख्यांना चिरडून टाकण्याची योजना तयार करण्यात आली होती.

पूर्व पाकिस्तानातील जनता फक्त मूलभूत अधिकार आणि मानवाधिकार यांची मागणी करत होती.परंतु ती मागणीही याह्याखानला सहन होत नव्हती. त्याने नरसंहाराचे हत्यार उपसून पूर्व पाकिस्तानातील जनतेला चिरडून टाकण्याचे ठरवले होते.

ऑपरेशन सर्च लाईटचे प्रमुख लक्ष्य होते ते म्हणजे ढाका विश्वविद्यालयाचे विद्यार्थी आणि शिक्षक.पाकिस्तानी सरकारच्या विरोधात चळवळ करणाऱ्यांचे ते प्रमुख आधारस्तंभ होते.त्यांना संपवणे हे पाकिस्तानी लष्कराचे प्रमुख उद्दिष्ट होते.त्या घटनेच्या दुसऱ्या दिवशी सकाळी अनेक तरूणांचे मृतदेह हे शेतांमध्ये, नद्यांमध्ये तरंगताना आढळून आले.काही मृतदेह आर्मी कॅंपच्या आसपास आढळून आले.

ऑपरेशन सर्च लाईट अंतर्गत पाकिस्तानी सैनिकांनी जो नरसंहार केला तो माणुसकीला काळीमा फासणारा होता.त्या नरसंहाराचे असंख्य पुरावे, निरपराध लोकांच्या हत्येचे फुटेज, मोठ्या प्रमाणातील कबरी, असंख्य प्रत्यक्षदर्शींकडून सादर करण्यात आलेले पुरावे, विदेशी पत्रकारांनी अभूतपूर्व नरसंहाराचे केलेले कव्हरेज इत्यादी गोष्टी उपलब्ध असुनही माणुसकीला काळीमा फासणाऱ्या दुष्कृत्याबाबत पाकिस्तान सरकारने अद्याप अधिकृतरित्या बांगलादेशची माफी मागितलेली नाही.

म्हणूनच जेंव्हा जेंव्हा संधी मिळते तेंव्हा बांगलादेश कडून माफीची मागणी करण्यात येते. विद्यार्थ्यांचे आंदोलन हाताबाहेर गेल्यानंतर ऑगस्ट २०२४ मध्ये बांगलादेशाच्या तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना यांनी तेथून पलायन केले आणि त्या भारताच्या आश्रयाला आल्या.त्यानंतर मोहंमद युनूस यांच्या नेतृत्वाखालील प्रशासनाने भारत विरोधी भूमिका घेऊन, पाकिस्तान बरोबर जवळीक साधण्याचा प्रयत्न चालवला आहे.

शेख हसीना यांनी आपल्या प्रदीर्घ कारकीर्दीत पाकिस्तानला खड्या सारखे बाजूला ठेवले होते.आता मोहंमद युनूस यांनी पाकिस्तान बरोबर जवळचे संबंध प्रस्थापित केले असून समुद्र मार्गे व्यापार सुरू केला आहे. लवकरच पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यात थेट विमानसेवा सुरू होणार आहे.आता बांगलादेशने केलेल्या मागण्यांबाबत पाकिस्तान काही ठोस निर्णय घेणार का हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

■ ■ ■

## वाचक लिहितात

### तर दिल्लीचा बंगाल होईल.... !

दिल्लीतील सिलमपूर भागात कुणाल गांधी नावाच्या एका हिंदू तरुणाची नुकतीच हत्या करण्यात आल्याचे वृत्त वाचनात आले. तेथील मुसलमान समाजातील ४ ते ५ तरुणांनी चाकूने भोसकून ही हत्या केल्याचे कुणाल यांच्या नातेवाईकांचे आणि स्थानिकांचे म्हणणे आहे.

या हत्येमुळे परिसरात प्रचंड तणाव निर्माण झाला असून नागरिकांवर भीतीचे सावट पसरले आहे. या भयामुळे परिसरातील हिंदूंनी त्यांच्या घरावर 'हिंदू पलायन', 'घर विकणे आहे', 'योगीजीं आम्हाला मदत करा', 'रेखा गुप्ताजी आमचे रक्षण करा' अशा प्रकारचे पोस्टर्स लावले आहेत. तेथील नागरिक पोलीस प्रशासनाकडे सातत्याने संरक्षणाची मागणी करत आहेत.

हिंदूंची ही दयनीय स्थिती पाहिल्यावर दिल्ली नक्की भारतात आहे की पाकिस्तानात असा प्रश्न स्वाभाविकपणे पडतो. जगाच्या पाठीवर कोठेही गेलो तरी तेथील बहुसंख्यांकाचा प्रभाव अल्पसंख्यांकांवर जाणवतो. इथे मात्र स्थिती त्याउलट आहे. हिंदूंनी सातत्याने नमते धोरण घेतल्याने आज त्यांच्याच घरात त्यांचे राहणे अवघड झाले आहे.

हल्लीच झालेल्या विधानसभा निवडणुकीत दिल्लीतील जनतेने हिंदुत्वाच्या मुद्यावर भाजपाला विजयी केले. त्यामुळे दिल्लीतील हिंदूंना भयमुक्त करणे आणि दिल्लीतील धर्मांध वृत्ती ठेचून काढण्याचे काम भाजपने प्राधान्याने करायला हवे नाहीतर दिल्लीचा बंगाल व्हायला वेळ लागणार नाही.

■ **सौ. मोक्षदा घाणेकर**
**काळाचौकी, मुंबई.**

### नामसाधनेचे महत्त्व!

कोरोना काळातील भीषण भयावहता आपण अनुभवली आहे. दररोज हजारो लोक मृत्यूमुखी पडत होते, त्यामुळे सर्वत्र भीतीचे व चिंतेचे वातावरण पसरले होते. मृत्यूचे भय सतत जाणवत असल्यामुळे प्रचंड तणावाची स्थिती निर्माण झाली होती.

अशा वेळी मनाची स्थिरता टिकवून ठेवण्यासाठी 'साधनेचे महत्त्व' यासंदर्भात वाचण्यात आले. सत्संगात सहभागी झाल्यानंतर मनाची स्थिरता वाढली. त्यामध्ये सांगितले जाणारे विषय, जसे की कलियुगातील सर्वश्रेष्ठ साधना म्हणजे नामसाधना! त्यानुसार नामजप केल्यानंतर मनाची नकारात्मकता कमी होऊन बाहेरील भीतीदायक वातावरणातही मन स्थिर होऊ लागले.

■ **सौ. वर्षा आवदे, नागपूर.**

# आंब्यासोबत हे पाच पदार्थ कधीही खाऊ नका



आंबा हे फळ प्रत्येकाला फार आवडतं... आंब्याचे देखील अनेक प्रकार असतात. पण आंबा खाताना काही गोष्टी लक्षात घ्यायलाच हवे. चुकीच्या पदार्थांसोबत आंबा खाल्ल्याने आरोग्यास अधिक नुकसान होऊ शकते. पाच पदार्थ असे आहेत जे आंब्यासोबत खाऊ नये.

**दही:** आंब्यासोबत दही खाल्ल्याने पचनाच्या समस्या उद्भवू शकतात. याचं कारण म्हणजे दोन्ही गोष्टींचं परिणाम वेगवेगळे आहेत. अशा परिस्थितीत, त्यांचं एकत्र सेवन केल्याने गॅस, अपचन किंवा पोटदुखीसारख्या समस्या उद्भवू शकतात. याव्यतिरिक्त, जेव्हा उष्ण आणि थंड स्वरूपाचे पदार्थ एकत्र येतात तेव्हा त्वचेवर फोड किंवा ॲलर्जी देखील होऊ शकते.

**मसालेदार पदार्थ :** मिरच्या, गरम मसाला किंवा आंब्यासोबत तळलेले पदार्थ यांसारखे मसालेदार पदार्थ खाल्ल्याने पोटात जळजळ होऊ शकते.

**थंड पेये:** आंबे खाल्ल्यानंतर लगेच थंड पाणी, थंड पेये पिणे किंवा आईस्क्रीम खाणे पचनसंस्थेला मंदावू शकते. ज्यामुळे पोटफुगी होऊ शकते. शिवाय, आंबा आणि कोल्ड्रिंक दोन्ही अत्यंत गोड आहेत. त्यांचे एकत्र सेवन केल्याने शरीरात साखरेची पातळी अचानक वाढू शकते, जी मधुमेहाच्या रुग्णांसाठी धोकादायक ठरू शकते.

**प्रक्रिया केलेले अन्न :** चिप्स, बर्गर किंवा आंब्यासह जंक फूडसारखे प्रक्रिया केलेले पदार्थ खाल्ल्याने पचनसंस्थेवर दबाव येतो आणि एखाद्या व्यक्तीला पोट फुगल्यासारखे किंवा जड वाटू शकते.

**लिंबूवर्गीय फळे :** आंब्यामध्ये नैसर्गिक साखर असते ज्यामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर असते. संत्री आणि लिंबू यांसारखी आंबट फळे सोबत खाल्ल्याने शरीरातील आम्ल पातळी मोठ्या प्रमाणात वाढू शकते. ज्यामुळे एखाद्या व्यक्तीला ॲसिडिटी, छातीत जळजळ, गॅस आणि बद्धकोष्ठता यासारख्या पचनाच्या समस्या येऊ शकतात.

■ ■ ■

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### पुतळ्यांचे मनोगत

बंधुता समता एकतेसाठी
आयुष्यभर झटलो आम्ही
प्रेरणा मिळावी
भावी पिढीला
म्हणून पुतळे
उभारले तुम्ही . .

जात - पात धर्मभेद
नाही आम्हा अपेक्षीत
जातीच्या पिंजऱ्याने आम्हा
तुम्ही केले संकुचित . .

उभारा पुतळे
करा आमचा उदो उदो
पण शपथेवर खरे सांगा
आमच्या आदर्शांचा तुम्ही
तरी अंगीकार
केला काहो? ..

महासागर भंडारा
मंगळवार २२एप्रिल२०२५
पान ६

# दिव्यांग व्यक्तींकरिता वाहन परवाना शिबिर

## २३ एप्रिल रोजी भंडाऱ्यात आयोजन

**भंडारा** :दिव्यांग व्यक्तींना शासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी शासनाच्या १०० दिवसीय कृती कार्यक्रमांतर्गत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, भंडारा येथे २३ एप्रिल २०२५ रोजी विशेष समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात दिव्यांग व्यक्तींना वाहन परवाना प्राप्त करण्यासंदर्भात मार्गदर्शन व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शिबिरासाठी सहायक मोटार वाहन निरीक्षक श्री. विभोर शेवटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी राजेंद्र वर्मा यांनी जिल्ह्यातील सर्व पात्र दिव्यांग नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

*शिबिराचे ठिकाण:*
*उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, भंडारा*
*दिनांक: २३एप्रिल २०२५ला*
*जास्तीत जास्त दिव्यांग व्यक्तींनी या शिबिरात सहभागी होऊन आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.*

# बॅटरीची चोरी

**लाखनी** : लाखनी पोलीस स्टेशन अंतर्गत आहे कि, यातील आरोपी प्रमोद उर्फ काल्या अशोक बावनकुळे वर्ष रा. मुरमाडी/ सावर, एजाज सय्यद रहमद सय्यद रा. मुरमाडी/ सावरी , मंगेश अमृत टिचकुले रा. सावरी/मुरमाडी ४) रमेश शोभामल मेघराजानी रा. बाजार वार्ड लाखनी यांनी मातोश्री आश्राम केसलवाडा / वाघ येथे संगणमत करुन फिर्यादी किशोर मोतीराम हलमारे रा. सेलोटी ह. मु. मातोश्री आश्राम केसलवाडा वाघ काम करीत असलेल्या मातोश्री आश्रम मधील दलीराम गिन्हेपुंजे यांचे मालकीचे महिन्द्रा सरपंच ट्रॅक्टर आश्रम मध्ये ठेवले असतांना ट्रॅक्टरची बॅटरी सुना मौका पाहुन चोरुन नेण्याचा प्रयत्न करतांना मिळुन आल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३०३ (२), ६२,३ (५) बी.एन.एस.-२०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

# अमृत भारत रेल परियोजनेची खा.डॉ.प्रशांत पडोळे यांनी केली पोलखोल

## खासदार डॉ.प्रशांत पडोळे यांची रेल्वे विभागीय अधिकाऱ्यांशी आढावा बैठक केला योजनेचा मुद्दा उपस्थित



**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा ,दि.२१ :** रेल्वे संदर्भाच्या आढावा बैठकीमध्ये भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्राचे

खासदार डॉ.प्रशांत पडोळे यांनी विभागीय रेल मंडल अधिकारी विजय कुमार गुप्ता आणि इतर रेल्वे विभागीय अधिकाऱ्यांची आढावा बैठक रेल विभागीय मंडल कार्यालय नागपूर येथे घेतली. या बैठकीत भंडारा, गोंदिया जिल्ह्यातील विविध महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली आणि रेल्वे विभागातील अनेक समस्या उघडकीस आल्या.

अमृत भारत रेल परियोजनेवरील प्रश्न बैठकीत अमृत भारत रेल परियोजनेच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. खासदार पडोळे यांनी सांगितले की, या प्रकल्पातील कामे केवळ लीपापोती स्वरूपाची आहेत. जुन्याच कामावर नवीन काम दाखवत आहेत.

कामे अतिशय वेगाने केली जात आहेत, पण त्याचा दर्जा निकृष्ट आहे. काही फोटो आणि व्हिडिओ दाखवून त्यांनी रेल्वे विभागाची पोलखोल केली. तसेच, रेल्वेचे बांधकाम जुने असून त्याचे स्ट्रक्चर ऑडिट करण्याच्या सूचना खासदारांनी दिल्या.

***रेल्वे हॉस्पिटलच्या सुविधांवरील चिंता***

रेल्वे विभागाकडे स्वतंत्र १८५ बेडचे हॉस्पिटल असूनही, त्यात अनेक आवश्यक सुविधा नसल्यामुळे रेल्वे कर्मचारी खाजगी रुग्णालयात उपचारासाठी जातात. यावर खासदार पडोळे यांनी आपली खंत व्यक्त केली.

गोंदिया ते बल्लारशहा नवीन रेल्वे ट्रॅक आणि सौंदड ओवर ब्रिज गोंदिया ते बल्लारशहा दरम्यान नवीन रेल्वे ट्रॅक तयार होत आहे, मात्र सौंदड येथील ओवर ब्रिजचे काम अजून पूर्ण झालेले नाही. या कामाच्या विलंबाबाबत खासदारांनी विभागीय अधिकाऱ्यांना कडक सूचना दिल्या.

***पाणी साठवण आणि जलसंधारणासाठी रेल्वेचे प्रयत्न***

रेल्वे जवळ देशातील सर्वाधिक जागा असूनही, पाणी साठवण (वॉटर हार्वेस्टिंग) यंत्रणा नाही. खासदार पडोळे यांनी रेल्वेने पुढाकार घेऊन सर्व रेल्वे स्थानक व इमारतींमध्ये जलसंधारणासाठी वाटर हार्वेस्टिंगची व्यवस्था करण्याचे निर्देश दिले.

***भंडारा शहरातील रेल्वे पटरी खाली जागेचा विकास प्रस्ताव***

भंडारा शहराच्या मध्यभागी रेल्वे पटरीखाली जागा आहे, जी रेल्वेने रस्त्याच्या विकासासाठी दिल्यास शहरातील वाहतुकीची समस्या सुटू शकते. खात रोड, म्हाडा कॉलनी, शुक्रवारी वार्ड या भागांना राष्ट्रीय महामार्गांशी जोडणारा हा रस्ता शहरातील सर्वांत मोठा रस्ता बनेल. यासाठी भंडारा नगर परिषदेच्या प्रस्तावाला विभागीय मंजुरी देण्याचे आदेश खासदार पडोळे यांनी विभागीय अधिकाऱ्यांना दिले. तसेच रेल्वे च्या जागेवरील अतिक्रम हा चिंतेचे विषय असल्याचे खा.पडोळे यांनी चिता व्यक्त केली.

या बैठकीत रेल्वे विभागातील कामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली असून, कामे नियोजित आणि दर्जेदार पद्धतीने करावीत, तसेच कर्मचारी सुविधा सुधारण्याच्या बाबतीतही योग्य तो विचार करावा, असे निर्देश खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांनी दिले आहेत. रेल्वेच्या विकासासाठी आणि कर्मचारी कल्याणासाठी पुढील काळातही असे आढावा बैठक घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

***गोंदिया-बल्लारशहा दरम्यान नवीन दुहेरी रेल्वे लाईन***

गोंदिया ते बल्लारशहा नवीन रेल्वे ट्रॅकचे काम कधी पूर्ण होणार याबाबत थेट तारीख किंवा पूर्ण होण्याचा कालावधी या संदर्भात कोणतीही स्पष्ट माहिती उपलब्ध नाही. मात्र, या रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणासाठी ४,८१९ कोटी रुपयांच्या प्रकल्पाची घोषणा करण्यात आली आहे, ज्यामुळे हा प्रकल्प मोठ्या प्रमाणावर पुढे जाणार आहे .

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या प्रकल्पाला मोठे महत्त्व दिले असून, यामुळे विदर्भातील पर्यटन, व्यवसाय आणि वाहतूक सुधारण्यास मदत होईल असा विश्वास व्यक्त केला आहे.

या प्रकल्पामुळे गोंदिया-बल्हारशहा दरम्यानची रेल्वे लाईन दुहेरी होऊन प्रवाशांसाठी आणि मालवाहतुकीसाठी अधिक कार्यक्षम होईल, परंतु काम पूर्ण होण्याच्या तारखेवर अद्याप कोणतीही ठोस माहिती किंवा अधिकाऱ्यांची प्रतिक्रिया उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे कामाच्या पूर्णतेसाठी निश्चित कालमर्यादा अद्याप स्पष्ट झालेली नाही.

खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांनी विभागीय रेल मंडल अधिकारी विजय कुमार गुप्ता यांचे समक्ष कामात तत्परता, सुधारणा, प्रामाणिकपणा आणण्याचे आव्हान सर्व उपस्थितांना यावेळी केले. रेल्वे स्टेशन वर स्वच्छता ठेवावी असेही यावेळी सांगितले.

# वृक्षतोडीमुळे रेडीमेड कागदी पत्रावळी आवश्यक झाली

## लग्न आणि सणांच्या काळात पळसाची पत्रावळी अदृश्य

**शाहेद कुरैशी महासागर**
**साकोली , दि. २१ एप्रिल :** एकेकाळी घरांमध्ये बनवलेली आणि विविध प्रसंगी गोळा करण्यासाठी वापरली जाणारी पळसाची पाने आता तयार कागदाच्या वापराने जुन्या पालांच्या पानांची आठवण झाली आहे. झाडे तोडल्यामुळे तयार कागदपत्रांची गरज निर्माण झाली आहे.

पूर्वी माणूस निसर्गात उपलब्ध असलेल्या गोष्टींचा सर्जनशील वापर करून आपल्या राहणीमानाला अनुकूल वातावरण राखत असे. झाडांचे बहुविध उपयोग लक्षात येताच ते जंगलांचे रक्षण आणि जतन करत होते. कोणत्याही अपरिहार्य किंवा सक्तीच्या कारणाशिवाय त्याला एखादे झाड तोडावे लागले तर तो त्या जागी अनेक झाडे लावायचा. अनेक झाडांप्रमाणेच खजूरही त्यांच्या जीवनात उपयोगी पडत असे. त्याकाळी पालांची झाडे मोठ्या प्रमाणात होती आणि सर्वत्र झाडे असल्याने पानांची कमतरता नव्हती. साधारणपणे हिवाळ्याच्या काळात मोहरीची पाने खुडून त्याची पाने व पेंढा बनवायचा आणि बाजरीचा रस विविध कामांसाठी वापरला जायचा.

***अनेकांनी हा जोडधंदा म्हणून स्वीकारला - सूर्यवंशी***

स्थानिक पंचशील वॉर्डातील रहिवासी विनायक सूर्यवंशी यांनी सांगितले की, ३०-४० वर्षांपूर्वी अनेकांनी हा साईड बिझनेस म्हणून स्वीकारला आणि त्यातून त्यांना





**सुनील सूर्यवंशी** **विनायक सूर्यवंशी**

रोजगार मिळू लागला. त्यावेळी पत्रावळी तयार करणारे दिवसातून आठ ते दहा तास काम करायचे. हे काम दिवाळीनंतर सुरू व्हायचे; ज्यांच्या घरी कोणतेही कार्य असेल ते एक महिना किंवा पंधरवडा अगोदर ऑर्डर देतात. या पत्रावळी तयार करून विकून महिला व नागरिक आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते; एका दिवसात एक स्त्री तीनशे ते साडेतीनशे फाईल्स आणि द्रोण बनवायची. त्यावेळी लग्नसमारंभात ते मिळत नसे. आज हा व्यवसाय इतिहासजमा झाला आहे.

**पर्यावरण अनुकूल**

स्थानिक तलाव वॉर्डातील रहिवासी सुनील सूर्यवंशी यांनी सांगितले की, पळसाची पाने पर्यावरणपूरक आहेत. ते वापरल्यानंतर फेकून दिले तरी ते कुजतात आणि त्यामुळे कोणालाही धोका नाही. आजच्या प्लास्टिक थर्माकोलच्या पत्र्या भलेही छान दिसत असतील, पण त्या पर्यावरणासाठी मोठी समस्या बनली आहेत. पण आज पर्यावरणाचा विचार करणारे प्रत्येकजण प्लास्टिक आणि थर्माकोलच्या ताट, वाट्या, ग्लास वापरतो त्यामुळे त्यांचा व्यवसाय बंद पडला आहे.

# रेती तस्करांवर तुमसर पोलिसांची मोठी कारवाई

## * रेती माफियांच्या कुळात खळबळ , चालक मालकांवर गुन्हे दाखल
## *रेती चे रितसर ब्रँडिंग झाले पाहिजे? पण शासन लक्ष देणार का?



**महासागर प्रतिनिधी**
**तुमसर, दि. २१ एप्रिल :** विधानसभेचे अख्खे अर्थसंकल्प गाजविणाऱ्या तुमसरात थेट महसूल मंत्र्यांनी अधिकाऱ्यांवर निलंबनाचे ताशिरे ओढले असताना देखील रेतीची अवैध वाहतूक तालुक्यात जशास तशी राजरोषपणे सुरू असल्याचे शहर पोलिसांनी केलेल्या एका धडक कारवाईतून पुन्हा पुढे आले आहे. तुमसर पोलीस निरीक्षक संजय गायकवाड यांनी थेट कारवाई करत तब्बल चार टीप्पर अडवून विना रॉयल्टी रेतीच्या वाहतुकीचा भांडाफोड केला आहे. सदर कारवाई रविवार, २० एप्रिल रोजी तुमसर-खापा शिवारात करण्यात आली असून जप्तीतील रेती लोड असलेली अवजड वाहने कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात वाहतूक पोलिसांच्या तैनातीत लावण्यात आली आहे. सदर कारवाईत स्वतंत्र गुन्हे नोंद करण्यात आले असून वरिष्ठांच्या मार्गदर्शनात पो. उप निरीक्षक अमोल कोल्हे तथा श्रीचंद गंगवानी व सहकारी करत आहेत. त्यामुळे तालुकाभरात रेती माफियांचे धाबे दणाणले आहे.

**चार टीप्पर जप्त**

शहरातून धावत सुटलेल्या विना परवाना वाहनांना ,पो.नि. संजय गायकवाड यांनी अडविले. त्यात गाडी क्रमांकात खोडतोड असलेले (एमएच ४९ ८८८२), एमएच ४० सीटी ७३९१, एमएच ४९ सीएफ ७४७४ व एमएच ४९ बीझेड २५७७वर जप्तीची कारवाई केली. त्यात प्रत्येक गाडीत अंदाजे ६ प्रमाणे एकूण २४ ब्रास वाळूची नोंद आहे. रेती व्यतिरिक्त गाड्यांची एकूण किंमत रुपये प्रमाणे १ कोटी ५०लक्ष रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आहे.

**चालक मालकांवर गुन्हे दाखल**

जमीन महसूल कायदा, पर्यावरण संवर्धन अधिनियम तसेच सार्वजनिक संपत्ती नुकसान अधिनियम व वाहतूक कायद्याच्या विविध कलामनव्ये सर्व चालक अर्जुन पप्पु जाधव(४४, राह. पारडी), शेख मेहमुद शेख मेहबुब शेख (३७, राह. ताजबाग), किरण विश्वनाथ सतिकोसरे(४२, राह. बोरी, रामटेक) , करिम रज्जाक शेख (३५, राह. पारडी) तसेच सर्व मालक काशिफ खान (२८, राह. महल), ईद्रीस नथोनी अन्सारी (५०, राह. भांडेवाडी) , अजिज मुस्तफा शेख (४५, राह. खरबी), ईमरान खान बब्बु पठाण (४०, राह. उप्पलवाडी) असे ८ आरोपीं तसेच घाट मालका विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून वाहनांच्या चालकांना अटक करण्यात आली आहे. घटनेनंतर पोलीस ठाण्यात माफियांची वर्दळ त्यावेळी पहावयास मिळाली. पोलीस कारवाई नंतर महसूल विभागाची एन्ट्री आरोपींना आणखीनच पेचात टाकणार असल्याचे बोलले जात आहे.

**मग काय ते निलंबन चुकीचे?**

तुमसर-मोहाडी विधानसभेचे आमदार राजू कारेमोरे यांच्या एका पत्रातून महसूल विभागात कधी न झालेली कारवाई करण्यात आली होती. त्यात तत्कालीन उपविभागीय अधिकारी दर्शन निकाळजे व तहसीलदार मोहन टिकले यांचे निलंबन झाले खरे, मात्र रेतीचा अवैध तांडव काही थांबलाच नाही. याउलट माफियांन सुगीचे दिवस आल्याचे चित्र आहे. त्यामुळे महसूल खात्याने चौकशी अहवालावर बोट ठेऊन केलेली निलंबनाची ती कारवाई आजच्या गुन्हयामुळे चुकीची ठरत आहे, हे मात्र खरे!

**रेती चे रितसर ब्रँडिंग झाले पाहिजे? पण शासन लक्ष देणार का?**

मानवता ची प्रतीक वैनगंगा आणि बावनथडी रेती खनिज संपदा ने नटलेली आहे, त्या 'रेती' चे महाराष्ट्र शासनाने ब्रँडिंग करून त्या चा नामो लेख करून महसूल वाढी साठी प्रयत्न केले पाहिजे.

**महसूल वाढीसाठी झालेले प्रयत्न**

जिल्ह्यातील विकासात्मक धोरण ठरविन्या करिता कामात येतील, महसूल: वाढीसाठी झालेले प्रयत्न कूच कामी ठरत आहे याला जवाबदार कोण? हा चरचे चा विषय झालाआहे. आमचे आजी आणि माजी आमदार यानी रेती चा मुद्दा उचलून धरला पण रेती चे धागे दोरे दोन अधिकारी व्यतिरिक्त अन्य लोकांशी जुड़लेले दिसत नाही. हे ही चर्चेत चिघडल्या जात आहे.

# प्रादेशिक पाणीपुरवठा योजना जाणार पडद्याआड !

## जलकुंभावर जल जीवन मिशनचा ताबा : केला फक्त तगरंगोटीवर खर्च

**महासागर प्रतिनिधी**
**सिहोरा ,दि.२१ :**नागरिकांना जलशुद्धीकरण आणि प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या माध्यमातून शुद्ध पाणी उपलब्ध करण्यासाठी सुकळी नकुल प्रादेशिक पाणी पुरवठा बपेरा गावाचे हद्दीत तयार करण्यात आली. योजनेची जलवाहिनी जिल्हा परिषद क्षेत्रातील प्रत्येक गावात देण्यात आली.

या योजनेचे अभिनव जलकुंभ निर्माण करण्यात आली. गुंडभर पाणी योजनेने नागरिकांना दिले नसताना योजनाच गुंडाळण्यात आली आहे. या योजनेच्या जलकुंभावर जल जीवन मिशनने ताबा घेतला आहे. प्रादेशिक पाणी पुरवठा योजना पडद्याआड गेल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे.

बपेरा जिल्हा परिषद क्षेत्रातील गावांना शुद्ध पाणी पुरवठा करण्यासाठी सुकळी नकुल प्रादेशिक पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे.

योजनेला जागा मिळाली नसल्याने बपेरा गावाचे हद्दीत ही योजना साकारण्यात आली आहे. योजनेला जलशुद्धीकरण केंद्र असल्याने जिल्हा परिषद क्षेत्रातील देवरी देव, सुकळी नकुल, बपेरा, देव-सर्रा, बिनाखी, गोंडीटोला, ब्राह्मणटोला, महालगाव, वारपीडकेपार, सोंड्या, गावात जलवाहिनी घालण्यात आली. या योजनेचे गावात अभिनव जलकुंभ तयार करण्यात आले.

जलवाहिनी आणि जलकुंभ बांधकामावर कोट्यवधी खर्च करण्यात आले. बावनथडी नदीवर पं-पगृह देण्यात आले. योजनेपासून गा-वांचे अंतर १२ किमीवर असल्याने विलंब पाणीपुरवठा करण्याची अपेक्षा गावकऱ्यांना होती. परंतु झाले उलटेच कोट्यवधी खर्चुनही योजनेचे पाणी गावात पोहचले नाही.

पुन्हा गावकऱ्यांना मुबलक पाणीपुरवठा करण्यासाठी जलजीवन मिशन हर घर नल योजना गावात मंजूर करण्यात आली. परंतु या योजनेने नागरिकांचा विश्वास संपादन केला नसल्याने सर्वेक्षण करताना गावात विरोध होऊ लागला आहे. गावातील नळ योजनाच बरी, असे ठणकावून सांगितले आहे. परिसरात बहुतांश गावात जल जीवन मिशन हर घर नल योजना देण्यात आली आहे. गेल्या वर्षभरापासून एक थेंब पाणी नागरिकांचे दारात पोहचले नाही. जल जीवन मिशन हर घर नल योजनेच्या प्रस्तावित कामाची विभागीय चौकशी करण्याची ओरड सुरू झाली आहे.

***तरीही गावकरी तहानलेलेच !***
***:-***

नागरिकांना पाणी पुरवठा करण्यासाठी प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, ग्रामीण पाणी पुरवठा योजना, जल जीवन मिशन हर घर नल योजना अशा योजना राबविण्यात आलेल्या आहेत. परंतु योजना



नागरिकांना मुबलक पाणी पुरवठा करू शकल्या नाहीत, विशेषतः जल जीवन मिशन हर घर नल योजना वादग्रस्त ठरली आहे.

# सेवा हक्क दिनानिमित्त विविध उपक्रम प्रभावीपणे राबवा - डॉ.संजय कोलते

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा, दि. २१ एप्रिल :** जिल्ह्यामध्ये ग्रामीण व जिल्हास्तरावर येत्या २८ एप्रिल रोजी सेवा हक्क कायद्याची दशकपूर्ती व पहिला 'सेवा हक्क दिन' साजरा करण्यासाठी शासनाने निर्धारित केलेले विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना, जिल्हाधिकारी डॉ.संजय कोलते यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी संजय कोलते यांच्या अध्यक्षतेखाली यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयात सेवा हक्क दिन' साजरा करण्यासंदर्भातील पूर्वतयारीचा आढावा घेण्यात आला. यावेळी बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी, स्मिता बेलपत्रे, सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता आणि व्यक्तींना पात्र

लोकसेवा देणाऱ्या शासकीय विभागांमध्ये पारदर्शकता व उत्तरदायित्व आणण्यासाठी राज्यात २८ एप्रिलपासून लोकसेवा हक्क कायद्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्य शासनाने या वर्षीपासूनच २८ एप्रिल हा 'सेवा हक्क दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे आणि या कायद्याची दशकपूर्तीही होत आहे. या निमित्ताने जिल्ह्यातील ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, जिल्हा प्रशासन, नगरपरिषदा व नगरपंचायतांच्या कार्यक्षेत्रांमध्ये राबवायच्या विविध उपक्रमांची माहिती यावेळी देण्यात आली.



अनुषंगिक मार्गदर्शन व सूचनाही करण्यात आल्या. तसेच प्रत्येकांनी आपली जबाबदारी पारदर्शकपणे पार पाडण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना केल्या. सेवा हक्क दिनाच्या निमित्ताने ग्रामपंचायत स्तरावर आदर्श आपले सरकार केंद्राचे उद्घाटन करणे, विशेष ग्रामसभेचे आयोजन करून लोकसेवा हक्क कायद्याच्या ठळक तरतुदींचे वाचन करून ग्रामपंचायत सदस्यांना कायद्याच्या प्रति वितरित करणे, जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायत, गट कार्यालय भंडारा. ग्रामपंचायतमध्ये या कायद्याची माहिती देणारे सूचना फलक लावणे, अधिसूचित सेवांची व शुल्काची माहिती देणारे क्यूआर कोड लावणे यासह संबंधित उपक्रम गाव-गावात राबविण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी सुचना देऊन उपस्थित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांचा होणार सत्कार

जिल्हास्तरावर सेवा हक्क दिनानिमित्त विविध समारंभाचे आयोजन करून लोकसेवा हक्क कायद्याचे वैशिष्ट्ये विशद करणे आणि विविध विभागांकडून देण्यात येणाऱ्या सेवांच्या आढावा घेऊन उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार करणे, जिल्ह्यात सेवादूत योजना सुरू करणे, नागरिकांना एसएमएसद्वारे या कायद्याबाबत व आपले सरकार पोर्टलची माहिती देणे, शाळा व महाविद्यालयांमध्ये या कायद्याच्या जागृतीसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करणे, लोककलांद्वारे या कायद्याचा प्रचार-प्रसार करण्याबाबत यावेळी २८ एप्रिल हा सेवा हक्क दिन म्हणून करण्यात साजरा येतो. सूचना देण्यात आल्या. नगर पालिका क्षेत्रांमध्ये सेवा हक्क दिनानिमित्त विशेष सभेचे आयोजन करून या कायद्यात अंतर्भूत सेवा देण्याचा कामगिरीच्या अवाहन सादर करणे, नागरिकांना घरपोच सेवा देण्यासाठी 'सेवादूत' योजना सुरू करणे, नागरी सुविधा केंद्रांद्वारे सेवा हक्क कायदा व आपले सरकार पोर्टलबाबत माहिती देणे, प्रभाग कार्यालय, पर्यटन व तीर्थस्थळे, महाविद्यालय परिसर आदी ठिकाणी लोकसेवा हक्क कायद्याबाबत माहिती फलक लावण्याबाबत यावेळी जिल्हाधिकारी डॉ.संजय कोलते यांनी मार्गदर्शन करून सूचना दिल्या. यामुळे नागरिकांना सेवा हक्क कायद्याची माहिती होईल व नागरिकांना त्यांचे अधिकार कळण्यास मदत होईल.

# अखिल भारतीय ग्राहक पंचायत च्या पश्चिम क्षेत्रीय संघटन मंत्री या पदावर नितीन काकडे यांची निवड

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा , दि. २१ एप्रिल :** उत्तर प्रदेश येथील बाराबंकी येथे अखिल भारतीय ग्राहक पंचायत ची राष्ट्रीय कार्यकारिणी सर्वसाधारण सभा दिनांक १३ व १४ एप्रिल ला पार पडली. राष्ट्रीय अध्यक्ष श्री नारायण भाई शहा यांनी भंडारा येथील अखिल भारतीय ग्राहक पंचायत चे विदर्भ प्रांत सचिव श्री नितीन काकडे यांची राष्ट्रीय कार्यकारिणीत संपूर्ण महाराष्ट्रातील चार प्रांत कोकण, देवगिरी, मध्य महाराष्ट्र व विदर्भची जबाबदारी सोपवून त्यांची पश्चिम क्षेत्रीय संघटन मंत्री या पदावर पुढील ३ वर्षा करीता निवड केली. भंडारा जिल्हा संघटन मंत्री जयंत सब्जीवाले, सचिव अनिल शेंडे, नगर अध्यक्ष रविंद्र तायडे, संजय



आयलवार, चंद्रशेखर साठे, लोकेश मोहोबंशी, प्रकाश कुरोडे, खेडीकर, पारधी साहेब, प्रसिद्धी प्रमुख सईद शेख, जयश्री सातोकार, दीप्ती कुरोडे, विष्णू पंत पंडे यांनी त्यांचे अभिनंदन करून नवीन जवाबदारी करीता शुभेच्छा दिल्यात.

RNI No.-
MAHAMAR-2010/35801

**मालक, मुद्रक, प्रकाशक** - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर - १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. **संपादक** - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-**सुरेश लक्ष्मण कोटगले,** फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)



## जास्त विचार करु नकोस

मॅच मेकिंग

गेली दोन वर्षे बॉयफ्रेंडबरोबर रिलेशनशीपमध्ये होते. या नात्याकडे गांभीर्याने पहात होते. पण मित्राला परदेशी जॉब लागला आणि आम्हा दोघांनाही लाँग डिस्टन्स रिलेशनशीप नको असल्यानं ब्रेक अप करण्याचा निर्णय घेतला. पण त्यानंतर दोन महिन्यांमध्येच तो नव्या रिलेशनशीपमध्ये असून लवकरच त्या मुलीशी लग्न करणार असल्याचं एका कॉमन फ्रेंडकडून समजलं आहे. खरं तर मला त्याच्याबद्दल आनंद आहे, पण इतक्या लवकर तो माझं प्रेम विसरल्याचं दु:खही आहे. या घटनेमुळे प्रेमाकडे बघण्याचा माझा दृष्टिकोन बदलला आहे. या नैराश्यातून मी कशी बाहेर पडू?

– एखाद्या नात्याकडे बघण्याची प्रत्येकाची पद्धत वेगळी असते. कोणी लवकर मूव्ह ऑन करतो तर कोणाला अधिक वेळ लागतो. त्यामुळे ब्रेक अप नंतर तुझ्या बॉयफ्रेंडने लगेचच नवं नातं स्वीकारलं यात चुकीचं काही नाही आणि तू थोडा वेळ घेत आहेस हेदेखील सामान्य आहे. म्हणूनच विनाकारण ताण घेऊ नकोस. कोणत्याही कॉमन फ्रेंड्च्या माध्यमातून अथवा सोशल मीडियावरुन एक्स बॉयफ्रेंडबद्दल जाणून घेण्याचा प्रयत्न करु नकोस. आता तू पूर्णपणे तुझ्या करिअरकडे आणि भविष्याकडे फोकस कर. म्युच्युअली ब्रेक अपचा निर्णय घेतला असल्यामुळे स्वत:ला अपराधी समजू नकोस.

## पाचशे रुपयांपासून व्यवसाय, आता मालकीची कंपनी

अचिव्हर

मनात काही करण्याची दुर्दम्य इच्छा असेल तर तुम्ही ठरवलेल्या ठिकाणापर्यंत नक्कीच पोहोचाल, हे विधान जहानाबादचा रहिवासी अभिषेक कुमार याला चपखल लागू होते. एकेकाळी ५०० रुपयांपासून व्यवसाय सुरू करणारा ३५ वर्षांचा हा तरुण कंपनी काढेल, असा विचारही कुणी केला नव्हता. आज तो प्रसिद्ध उद्योजक असून अनेक प्रकारची लोणची बनवतो. तो फ्लिपकार्ट, ॲमेझॉन आणि स्वत:च्या आउटलेटवरून मार्केटिंग करत आहे.

या व्यवसायात त्याने आठ जणांना रोजगारही दिला आहे. यासोबतच कंपनीची वेबसाइटही सुरू केली आहे. यायोगे प्रत्येक ग्राहकाला लोणचे सहज खरेदी करता येईल. 'नेरा पिकल्स' असे त्याच्या कंपनीचे नाव आहे.

**पूर्वी बांगड्यांचा व्यवसाय**

२०२० च्या आधी अभिषेक बांगड्यांचा व्यवसाय करत होता. मात्र कोरोना महामारीने त्याची रोजीरोटी हिरावून घेतली. त्यानंतर तो काही वेळ घरी बसला. अशातच वृत्तपत्रातील एका जाहिरातीने त्याला मार्ग दाखवला. त्यात स्थलांतरित मजुरांना अनेक संधी उपलब्ध करून दिल्या होत्या. तीच जाहिरात पाहून मशरूमबद्दल जाणून घेण्याचा त्याने प्रयत्न केला. त्यासाठी तो कृषी कार्यालयात गेला. मशरूमची खरेदी-विक्री कशी होते आणि त्यापासून इतर काही पदार्थ बनवले जातात की नाही हेदेखील त्याला माहीत नव्हते. पण त्याने यासंबंधीची सगळी माहिती मिळवली.



**५०० रुपयांपासून प्रवास**

येथून त्याचा व्यवसायाच्या क्षेत्रातील प्रवास सुरू झाला. त्याने जिल्ह्यातील कृषी विज्ञान केंद्रात जाऊन मशरूम उत्पादनाचे प्रशिक्षण घेतले. मात्र दोन वर्षे उत्पादन घेऊनही अपेक्षित फायदा न झाल्यामुळे त्याने दुसरा मार्ग शोधू लागला. आता त्याने गंधार येथील कृषी विज्ञान केंद्रातून मशरूमपासून लोणचे बनवण्याचे प्रशिक्षण घेतले. मशरूमचे लोणचे बनवण्याचा प्रवास २०२२ पासून सुरू केला. यामध्ये अभिषेकला आईची पूर्ण साथ मिळत आहे.

**१५ प्रकारची लोणची**

अभिषेकने सांगितले की, आई घरी लोणची घालायची आणि आम्ही ते बाजारात आणायचो. त्यासाठी आवश्यक ते सर्व परवाने घेतले. आज आमची उत्पादने सर्वत्र ऑनलाइन आणि ऑफलाइन उपलब्ध आहे. हा व्यवसाय अवघ्या ५०० रुपयांपासून सुरू झाला. २२ मार्च रोजी बिहार उद्योजकता पुरस्काराने अभिषेकला सन्मानित करण्यात आले. सध्या त्यांच्याकडे १५ विविध प्रकारची लोणची तयार होतात. लवकरच आणखी १५ प्रकारची चविष्ट लोणची बाजारात आणण्याची तयारी सुरू आहे.

# युवा मानस

## फंडू एसएमएस

मिल जाता है दो पल का सुकुन चंद यारों की बंदगी में, वरना परेशां कौन नहीं अपनी अपनी जिंदगी में।

न बोलूं न लिखूं तो ये मत समझना कि भूल गए हम, खामोशियों ने भी कुछ जिम्मेदारी ले रखी है।

किसी की सलाह से रास्ते जरूर मिलते हैं। पर मंजिल तो खुद की मेहनतसेही मिलती है।

टेक अपडेट्स्

### खिडकीवर एसी बसवताय?




एसीला योग्य वायुवीजन मिळत नसेल तर यंत्र जास्त गरम होते. अशा परिस्थितीत गॅस गळती आणि स्फोट होण्याची शक्यताही वाढते. याशिवाय एसीचे वायरिंग खराब झाल्यास किंवा व्होल्टेजमध्ये चढउतार झाल्यास शॉर्ट सर्किट आणि आग लागण्याची शक्यता वाढते. हे टाळण्यासाठी एसीची वेळोवेळी तपासणी व्हावी. लोक वेळेत एसीचे सर्व्हिसिंग करत नाहीत. त्यामुळे कूलिंग कॉइल आणि कॉम्प्रेसरमध्ये घाण साचते. मशीनवर याचा दबाव येतो. यातूनच स्फोट होण्याचा धोका वाढतो. म्हणूनच एसीचे सर्व्हिसिंग नियमित करुन घ्यावे.

टेक टॉक

### व्हॉटस्पवरची ब्ल्यू टीक बंद करायचीय?


व्हॉट्सपवरील ब्लू टिक बंद करण्याची प्रक्रिया अगदी सोपी आहे. फक्त तीन सोप्या पायऱ्या वापरा. व्हॉट्सपवर मेसेज पाठवल्यानंतर एक टिक येते म्हणजे तुमच्या बाजूने मेसेज गेला आहे. डबल टिक म्हणजे मेसेज समोरच्या व्यक्तीपर्यंत पोहोचला आहे. ब्लू टिक म्हणजे तुम्ही पाठवलेला मेसेज वाचला गेला आहे. हीच ब्लू टिक बंद करण्यासाठी प्रथम ॲपच्या सेटिंग्जमध्ये जा. प्रायव्हसीवर क्लिक करा. रीड रिसीप्ट्सवर क्लिक करा. त्यानंतर मेसेजवरील ब्लू टिक बंद होईल.



उपाय

### हिस्ट्री हटवण्यासाठी...

आज फोनवरील 'चॅटजीपीटी' हिस्ट्री कशी हटवायची हे जाणून घ्या. सर्वप्रथम स्मार्टफोनमध्ये 'चॅटजीपीटी' ओपन करा. त्यानंतर उजव्या कोपऱ्यातील दोन ओळींच्या चिन्हावर क्लिक करा. येथे तुम्हाला हिस्ट्री दिसेल. आता 'जीपीटी' एक्स्प्लोर करा. तुम्ही 'चॅटजीपीटी' ला विचारलेल्या सर्व प्रश्नांचा इतिहास या विंडोमध्ये पाहू शकता. आता प्रोफाइल पुढील तीन ठिपक्यांवर क्लिक करा, त्यानंतर डेटा नियंत्रणावर क्लिक करा. पुढील विंडोमध्ये तुम्हाला 'क्लिअर चॅट हिस्ट्री' चा पर्याय दिसेल. त्यावर वर क्लिक करून, तुम्ही 'चॅटजीपीटी' वरून हिस्ट्री हटवू शकाल. वेबवरील 'चॅटजीपीटी' चा शोध इतिहास हटवण्यासाठी तुम्हाला प्रथम वरच्या कोपऱ्यातील प्रोफाइल आयकॉनवर क्लिक करावे लागेल. यानंतर तिसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या सेटिंग पर्यायावर क्लिक करा. आता जनरल पर्यायावर क्लिक करा. तळाशी 'डिलीट ऑल चॅट्स' वर क्लिक करावे लागेल. अशा प्रकारे तुम्ही 'चॅटजीपीटी' चा संपूर्ण इतिहास एकाच वेळी हटवू शकाल.




## 'चेक इन बॅगे'च्या मर्यादेत वाढ





महत्वाचे काही

सध्या शिक्षण, नोकरी वा पर्यटनाच्या हेतूने तरुणांना बरेचदा विमानाने प्रवास करावा लागतो. मात्र वारंवार विमानप्रवास करत असाल तर ही बातमी फक्त तुमच्यासाठीच आहे हे लक्षात घ्या. 'एअर इंडिया एक्सप्रेस'ने बॅगेज पॉलिसीमध्ये मोठा बदल केला आहे. याअंतर्गत प्रवाशांसाठी चेक इन बॅगेज मर्यादा वाढवण्यात आली आहे. प्रवाशांना सुविधा देण्यासाठी 'एअर इंडिया'ने हा बदल केला आहे. नवीन बदलानुसार 'एअर इंडिया एक्सप्रेस' आता प्रवाशांना सात किलो केबिन बॅगेजसह ३० किलो 'चेक-इन बॅगेज'ची सुविधा देत आहे.


'एअर इंडिया'च्या आधीच्या नियमानुसार प्रवाशांना फक्त २० किलोपर्यंतचे सामान 'चेक-इन' करण्याची परवानगी होती. मात्र आता नियमात बदल करून प्रवाशांना १० किलो अतिरिक्त सामानाची सुविधा देण्यात आली आहे. बॅगेज धोरणातील बदलानुसार प्रवाशांना दोन केबिन बॅगेज नेण्याची मुभा असेल. तथापि, दोन्ही पिशव्यांचे वजन सात किलोपेक्षा जास्त नसावे. यामध्ये लॅपटॉप बॅग, हँडबॅग, बॅकपॅक किंवा लहान आकाराच्या बॅग्ज समाविष्ट आहेत. केबिन बॅगेजचा आकार ४० सेमी * ३० सेमी *१० सेमी पेक्षा जास्त नसावा. या आकारातील बॅग समोरच्या सीटखाली आरामात बसू शकते.

**मुलांसाठी खास सवलत**

लहान मुलांसह प्रवास करणाऱ्या कुटुंबांना अतिरिक्त सुविधा देण्यात आल्या आहेत. 'बॅगेज पॉलिसी'मध्ये त्यांच्यासाठी १० किलो जास्तीची तरतूद करण्यात आली आहे. याचा अर्थ असा की, मुलांसह प्रवास करणारी कुटुंबे एकूण ४७ किलो वजन नेऊ शकतील. ४० किलो चेक-इन बॅगेज व्यतिरिक्त यात सात किलो केबिन बॅगेचा समावेश असेल.

**प्रत्येक फ्लाइटमध्ये सुविधा नाही**

अर्थात 'एअर इंडिया एक्स्प्रेस'च्या प्रत्येक फ्लाइटमध्ये प्रवाशांना ही सुविधा नाही. 'बॅगेज पॉलिसी'तील बदल भारत, मध्य पूर्व आणि सिंगापूरमधील आंतरराष्ट्रीय फ्लाइट्सवरच लागू होईल. इतर फ्लाइट्सवरील बॅगेज पॉलिसी पूर्वीप्रमाणेच राहील. म्हणजे २० किलो चेक-इन बॅगेज व्यतिरिक्त फक्त सात किलो केबिन बॅगेज नेता येईल. तेव्हा या एअरलाईन्सने प्रवास करणार असाल तर बदल लक्षात घ्या.



## निसर्गाचे अभ्यासक व्हा

करीअर ग्रोथ

तुम्हाला निसर्गाप्रती प्रेम असेल, जंगलं, प्राणी, पक्षी, किटक यांमध्ये रमायला आवडत असेल तर निसर्गतज्ज्ञ म्हणून काम करता येईल. ऑफबीट असा या करीअरमध्ये आज असंख्य संधी आहेत. निसर्गाकडे अनेकांचा कल वाढतो आहे. निसर्ग संवर्धनाची जाणीव होते आहे. अशा परिस्थितीत निसर्गतज्ज्ञ लोकांना मार्गदर्शन करू शकतात.

आपल्या देशात अनेक अभयारण्यं आणि राष्ट्रीय उद्यानं आहेत. इथे गेल्यावर प्राणी, पक्षी दुरुन बघण्यापेक्षा त्यांची योग्य ती माहिती मिळाली तर भटकंतीचा अनुभव अनेक अर्थांनी समृद्ध होत जातो. जंगलांमधल्या बऱ्याच गोष्टी आपल्याला माहीत नसतात. सर्वसामान्यांना ती दृष्टी नसते. एखाद्या पक्ष्याचा आवाज काहीतरी संदेश देत असतो. हरणांचं ओरडणं ही वाघ येत असल्याची वर्दी असू शकते. निसर्गतज्ज्ञांना या सर्वांचं ज्ञान असतं.

राष्ट्रीय उद्यानांमध्ये येणाऱ्या पर्यटकांना मार्गदर्शन करण्याचं काम निसर्गतज्ज्ञ करतात. वन विभागाशी सहकार्य करून गाईड्सना प्रशिक्षण देण्याचं कामही ते करतात. जंगलात सर्वेक्षण करतानाही यांची मदत घेतली जाते. शास्त्रज्ञांनाही त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ होतो. बायोसायन्स किंवा पर्यावरण व्यवस्थापनासारख्या विषयांमध्ये पदवी मिळवल्यानंतर तुम्ही या क्षेत्राकडे वळू शकता. नोकरी करण्यासोबतच तुम्ही स्वत:चा व्यवसाय सुरू करू शकता. टूर्स आयोजित करता येतील.

## बाजारात नवे काय?



स्मार्ट शॉपिंग

या महिन्यात बरेच स्मार्टफोन भारतीय बाजारपेठेत दाखल झाले आहेत. यामध्ये मोटोरोला ते विवो पर्यंतच्या स्मार्टफोनचा समावेश आहे. महिन्याची सुरुवातच 'मोटोरोला एज ६० फ्युजन' च्या लॉन्चने झाली आहे.

**मोटोरोला एज ६० फ्यूजन**

मोटोरोला एज ६० फ्युजन स्मार्टफोन चर्चेत आहे. या फोनमध्ये १.५ के मोल्ड डिस्प्ले आहे. या फोनची किंमत जवळपास ३५ हजार रुपये आहे.

**पोक्को ७१**

ही कंपनी बजेट फ्रेंडली स्मार्टफोन 'पोक्को सी ७१' भारतीय बाजारात लॉन्च करत आहे. या फोनची किंमत २० हजार रुपयांच्या दरम्यान असल्याचे समजते.

**आयक्यूओओझेड १० फाईव्ह जी**

'आयक्यूओओझेड१० फाईव्ह जी' भारतीय बाजारपेठेत दाखल होत आहे. या स्मार्टफोनची जाडी फक्त ०.७८९ सेमी आहे आहे. कंपनीचा दावा आहे की, हा बाजारातील सर्वात पातळ फोन फोन आहे. यात ७३००एमएएचची मोठी बॅटरी असून तो केवळ ॲमेझॉनवर विकला जातोय. त्याची किंमत २० ते २५ हजार रुपयांपर्यंत आहे.

**विव्हो टी ४५ जी**

'विव्हो' 'टी ३ फाईव्ह जी'चा उत्तराधिकारी म्हणून 'व्हिवो टी ४ फाईव्ह जी' भारतीय बाजारात लॉन्च करण्याच्या तयारीत आहे. हा बजेट स्मार्टफोन असेल जो कंपनी २५ हजार रुपयांच्या रेंजमध्ये लॉन्च करू शकते.

**व्हिवो व्ही ५० ई**

'व्हिवो' लवकरच 'व्ही ५०' मालिकेतील दुसरा स्मार्टफोन 'व्हिवो व्ही ५०ई' देखील भारतीय बाजारात लॉन्च करू शकते. ३० हजार रुपयांच्या रेंजमध्ये तो खरेदी करता येईल.

## रात्रीचा अभ्यास फायद्याचा



स्टडी टॉक

अनेकजण वर्षभर स्पर्धा परीक्षांच्या तयारीत असतात. तेव्हा मित्रांनो, रात्री उशिरा अभ्यास केल्याने होणाऱ्या फायद्यांकडे अजिबात दुर्लक्ष करु नका. दिवसाच्या तुलनेत रात्री अभ्यास करण्याचे अनेक फायदे आहेत.

दिवसभरातील फोन कॉल्स, सोशल मीडिया, मित्र आणि कौटुंबिक गोष्टी अभ्यासात व्यत्यय आणू शकतात. मात्र रात्री हे विचलित होणे टाळता येते. यामुळे एकाग्रता साधते आणि अभ्यास चांगला होतो. तुम्ही स्वत:च्या गतीने आणि आपल्या पद्धतीने अभ्यास करु शकता. स्वनियंत्रण आणि वेळेच्या व्यवस्थापनासाठीही हे उपयुक्त आहे.

**एकाग्रता वाढते**

अलिकडे शांत वातावरण सहसा रात्रीच अनुभवायला मिळते. रात्री रहदारीचा आवाज वा अन्य अडथळे नसतात. कमी आवाजामुळे मन एकाग्र होते. लक्ष केंद्रित होणे शक्य होते. कोणतीही संकल्पना सखोलपणे समजून घेण्यास याची मदत करते.

**मेंदू अधिक सक्रिय**

रात्री मेंदू अधिक सक्रिय होतो. सर्जनशील आणि गुंतागुंतीच्या समस्या सोडविण्यासाठी हा सर्वोत्तम काळ आहे. रात्री अभ्यास केल्याने अवघड संकल्पना पटकन समजून घेण्याची आणि लक्षात ठेवण्याची क्षमता वाढते. रात्रीची वेळ क्रिएटिव्ह थिंकिंगला उत्तेजन देते. अशा वेळी नवीन कल्पना सुचतात आणि अभ्यासाच्या नवीन पद्धतींचा अवलंब करण्यास मदत होऊ शकते.

रात्री दिवसभराच्या ताणाचा निचरा होऊन मन शांत झालेले असते. मन:स्थितीची साथ मिळते. याचाही फायदा करून घेता येतो. त्यामुळे गुंतागुंतीच्या विषयासाठी, आकलनासाठी हा वेळ निवडा. रात्री अभ्यास करताना फोन बाजूला ठेवा. हा नियम आवर्जून पाळा.


## असा निवडा स्लीव्हलेस टी-शर्ट

फॅशन पॅशन

दोस्तांनो, उन्हाळ्यात स्लीव्हलेस टी शर्टचा वापर सुखावह ठरतो. तेव्हा तुम्ही स्लीव्हलेस टी शर्टच्या खरेदीच्या विचारात असाल तर या टिप्स नक्कीच कामी येतील.

* स्लीव्हलेस टी शर्ट घेताना फिटिंगकडे नीट लक्ष द्या. स्लीव्हलेस टी शर्टचं फिटिंग महत्त्वाचं नसतं, हा एक गैरसमज आहे. प्रत्यक्षात योग्य फिटिंगचा टी शर्ट घेणं महत्त्वाचं असतं. फार ढगळ टी शर्ट घातल्याने तुम्ही विचित्र दिसू शकता.
* उन्हाळ्यात गडद रंगाचे टी शर्ट घालू शकता. सौम्य रंगाचे टी शर्ट थंडावा देतात. त्यामुळे पांढरा, ग्रे, बेच आणि आकाशी अशा रंगांना प्राधान्य द्या.
* टी शर्टचा कपडाही महत्त्वाचा असतो. उन्हाळ्यात कॉटन, लिलनचे कपडे घ्या. सुपिमा कॉटन हा प्रकार नेहमीच्या कॉटनपेक्षा जास्त आरामदायी असतो. त्यामुळे या कापडाचे टी शर्ट घ्या.
* उन्हाळ्यात फिरायला जायच्या योजना असतील तर स्लीव्हलेस टी शर्ट मस्ट आहे. शॉर्टस, कॅज्युअल पँट कशावरही तो चालून जाईल. त्यावर स्नीकर्स, फ्लोटर्स यापैकी काहीही घालता येईल.
* समुद्रकिनारी फिरायला जाणार असाल तर स्लीव्हलेस टी शर्ट तुमच्या बॅगेत असायलाच हवा.

मग काय दोस्तांनो, लागा खरेदीला. ट्रेंडी स्लीव्हलेस टी शर्टसची भरपूर व्हरायटी तुम्हाला पहायला मिळेल.



## ...म्हणून हवा पर्सनल ट्रेनर



फिटनेस फंडा

फिटनेस राखणं ही आजच्या धकाधकीच्या काळातली गरज आहे. हे कळतं पण वळत नाही अशी अनेकांची स्थिती असते. तुमचीही हीच समस्या असेल तर पर्सनल ट्रेनर अपॉईंट करण्याचा निर्णय घ्या. हा थोडा खर्चिक असला तरी खूप फायद्याचा सौदा ठरतो. कसा ते पाहू.

* वर्क आऊट ही एक कमिटमेंट आहे. पण प्रत्येकाला ती गांभीर्याने पाळता येतेच असं नाही. वर्क आऊट टाळल्यानंतर आपण आपल्यालाच माफ करत राहतो. मात्र पर्सनल ट्रेनर तुम्हाला व्यायाम टाळणं ही चूक असल्याचं प्रकर्षाने दाखवून देतो त्याचबरोबर वर्क आऊट करण्यासाठी पुश करत राहतो. हे मोटिव्हेशन खूप महत्त्वाचं असतं.
* नाही म्हटलं तरी व्यायाम थकवून टाकतो. त्यामुळे व्यायामाचा वेळ कमी करण्याकडे अथवा थकवणारे व्यायाम प्रकार टाळण्याकडे अनेकांचा कल असतो. पण पर्सनल ट्रेनर तुम्हाला अधिक धावण्यासाठी, अधिक पुश अप्स करण्यासाठी, अधिक जड प्लेट्स उचलण्यासाठी, ट्रेडमीलवर अधिक काळ धावण्यासाठी प्रवृत्त करतो. साहजिकच तुमच्या शरीराला आवश्यक तो आणि आवश्यक तेवढा व्यायाम मिळतो.
* तुम्ही एखाद्या बर्गर जॉईंटवर जाता. मग खाण्याचा मोह आवरत नाही. पण अशा वेळी पर्सनल ट्रेनरचे शब्द कानात घुमतात आणि तुम्ही मोहाचे ते क्षण टाळू शकता. कारण हा फिटनेस तज्ज्ञ केवळ व्यायामाबाबत मार्गदर्शन करत नसतो तर तुमचं समुपदेशनही करत असतो.
* पर्सनल ट्रेनरची वर्क आऊटसाठी तयार करताना बोलण्याची पद्धती वेगळी असते. '२५ क्रंचेस काढ' असं थेट सांगण्यापेक्षा तो तुम्हाला वेगळ्या भाषेत हीच बाब सांगतो.
* पर्सनल ट्रेनर असेल तर इच्छित फिटनेस लेव्हल गाठण्याची शक्यता ३० टक्क्याने वाढत असल्याचं एका निरीक्षण नोंदवण्यात आलं आहे. म्हणूनच पर्सनल ट्रेनर घेण्यास मागे-पुढे पाहू नका.

# भविष्यातील गरजा लक्षात घेऊन अद्यावतीकरणावर भर

## विधानपरिषद सभापती राम शिंदे : विधानभवनातील प्रस्तावित कामांचा आढावा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

विधानभवनाच्या भविष्यातील गरजा लक्षात घेता यात काळानुरूप अद्ययावतीकरण करणे आवश्यक आहे. यात पर्यावरण पुरक सुविधा, सर्वसमावेशक नियोजन यावर भर देत सर्व कामांची कालमयदित कार्यवाही करण्याचे निर्देश विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी दिले.

विधानभवन नागपूर येथील प्रस्तावित कामे व सद्यःस्थितीत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेण्यासाठी आज विधानभवनात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला विधानसभा सभापती ॲड. राहुल नार्वेकर दूरदृश्यप्रणालीद्वारे तर विधिमंडळाचे सचिव १ जितेंद्र भोळे, सचिव ३ विलास आठवले, सहसचिव (समिती) तथा विशेष कार्य अधिकारी ऋतुराज कुडतरकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता जनार्दन भानुसे, मुख्य अभियंता दिनेश नंदनवार यांच्यासह संबंधित कार्यान्वयन यंत्रणेचे प्रमुख उपस्थित होते.

नागपुरातील आमदार निवास येथे व्यापक बदल आवश्यक आहेत. याचा अनेक काळापासून विस्तार झालेला नाही. येथील पूर्ण एफएसआय वापरून आमदार निवासाचा विस्तार करण्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने सादर करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले.



आमदार निवास आणि विधानभवन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येतात. प्रशासकीय कामात सुसूत्रता यावी यासाठी ही ठिकाणे विधिमंडळाच्या अखत्यारित असण्याची गरज आहे. यासाठीची तत्काळ प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश सभापती शिंदे यांनी यावेळी दिले.

सिव्हिल लाईन्स परिसरातील १६० खोल्याचे बांधकाम अनेक वर्षांपूर्वी झाले आहे. या ठिकाणी पूर्ण एफएसआय वापरून बांधकाम करण्याचे नियोजन आहे. हिवाळी अधिवेशनासाठी येणारे अधिकारी आणि कर्मचारी यांच्या गरजा लक्षात घेता निवासव्यवस्थेत सुसूत्रता येण्याची गरज आहे. विधिमंडळाची इमारत वर्षभर सुस्थितीत राहावी यासाठी देखभाल दुरुस्तीचा सुधारित प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत.

हिवाळी अधिवेशनासाठी प्रशासकीय व विधिमंडळ कामकाजाच्या दृष्टीने सन्माननीय मंत्री तसेच राज्यमंत्री यांच्यासाठी कार्यालयीन दालनाची गरज लक्षात घेतली पाहिजे. यात आधुनिक तंत्रज्ञानाशी सुसंगत सुलभता असणे आवश्यक आहे. हे सर्व काम येत्या अधिवेशनापूर्वी कसे होतील यावर आढावा बैठकीत चर्चा करण्यात आली. आवश्यकतेप्रमाणे तात्पुरती दालने व व्यवस्था करण्यात यावी असे विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी सांगितले.

बैठकीपूर्वी विधानपरिषद सभापती राम शिंदे यांनी आज शासकीय मुद्रणालय, १६० गाळे, आमदार निवास, विधानभवन परिसराची पाहणी केली. यावेळी अनेक अधिकारी उपस्थित होते.

# सुप्रीम कोर्टाने संसदेपेक्षा मोठे होवू नये - आठवले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी नागपूरमध्ये महत्त्वपूर्ण विधान केले आहे. त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या अलीकडील निरीक्षणांवर नाराजी व्यक्त केली.

आठवले म्हणाले की संविधानानुसार कायदे करण्याचा सर्वाधिकार संसदेला आहे. वक्फ बोडार्बाबत मुस्लिम समाजाच्या हितासाठी केलेल्या कायद्यावर सर्वोच्च न्यायालयाने चुकीच्या पद्धतीने टिप्पणी करणे योग्य नाही.

त्यांनी स्पष्ट केले की सर्वोच्च न्यायालयाचा आदर असला तरी त्यांनी कायद्याच्या चौकटीत राहूनच काम करावे. या विषयावर संसदेत चर्चा होणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

राजकीय घडामोडींबाबत बोलताना आठवले यांनी उद्धव आणि राज ठाकरे यांच्या संभाव्य एकत्रीकरणावर भाष्य केले. ते म्हणाले की हे शक्य नाही आणि झाले तरी राज्याच्या राजकारणावर त्याचा फारसा प्रभाव पडणार नाही. त्याचबरोबर त्यांनी प्रकाश आंबेडकर यांच्याशी एकत्र येण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवण्याची ग्वाही दिली.

भाषेच्या मुद्द्यावर त्यांनी मराठी भाषेबद्दल आदर व्यक्त केला. मात्र प्रगतीसाठी हिंदी आणि इंग्रजी भाषांचे महत्त्व अधोरेखित केले. मनसेच्या पदाधिकाऱ्यांच्या दादागिरीवर कठोर कारवाईची मागणी केली.



शेवटी, बुद्धगया येथील महाबोधी महाविहाराच्या व्यवस्थापनाबाबत बौद्ध समाजाच्या मागणीला पाठिंबा देत जोगेंद्र कवाडे यांच्या आंदोलनात त्यांच्या पक्षाचे कार्यकर्ते सहभागी होणार असल्याचे जाहीर केले.

### भाजपला पाठिंबा

लवकरच बिहार आणि पश्चिम बंगालमध्ये विधानसभेची निवडणूक होणार आहे. या दोन्ही राज्यात भाजप आणि मित्रपक्षांच्या बाजूने वातावरण आहे. प. बंगालमध्ये जनता परिवर्तनाच्या बाजूने आहे. तेथे आरपीआयकडून भाजपच्या सगळ्याच उमेदवारांना समर्थन देणार असल्याचे ते म्हणाले.

बिहारमध्येही आरपीआयची ताकद आहे. परंतु तेथेही नितीश कुमार आणि भाजपचे सरकार पुन्हा सत्तेवर यावे म्हणून भाजपच्या सगळ्याच उमेदवारांना समर्थन देत असल्याचेही आठवले यांनी सांगितले. यावेळी पक्षाचे राजन वाघमारे, ॲड. विजय आगलावे, बाळासाहेब घरडे, विनोद थुल आणि इतरही नेते उपस्थित होते.

# कोयत्याचे १२ वार करीत प्रेयसीच्या नवऱ्याचा खून

**अनैतिक संबंधांतून हत्येचा थरार**

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

पाचपावली पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका व्यक्तीची निर्घृण हत्या झाली आहे. बांगलादेश नाईक तलाव परिसरात ही घटना घडली. आरोपी गितेश उर्फ रजत उके याने शेरा मलिक या व्यक्तीची हत्या केली.

शेराच्या पत्नीसोबत गितेश उके याचे दोन वर्षांपासून अनैतिक संबंध होते. दोघेही वारंवार बाहेर फिरायला जायचे. काही महिन्यांपूर्वी शेरा मलिकला या संबंधांची माहिती मिळाली होती. त्याने गितेशला समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र, गितेशने त्याचे ऐकले नाही.

दोघांमधील वाद वाढत गेला. एकमेकांना जीवे मारण्याच्या धमक्या देण्यापर्यंत गोष्टी पोहोचल्या. शेरा मलिक आपल्याला ठार मारेल या भीतीने गितेशने त्याची हत्या करण्याचा कट रचला. त्याने दहा दिवसांपूर्वी एक कोयता विकत घेतला.

रविवारी गितेशने त्याचा मित्र भोजराज कुंभारे याला शेरा मलिकची माहिती काढण्यासाठी पाठवले. भोजराजने शेरा घरी असल्याची खबर दिली. दोघेही ॲक्टिव्हावर बसून शेराच्या घरी गेले. गितेशने शेराला बाहेर बोलावले आणि त्याच्या गळ्यावर कोयत्याने १२ वार केले. शेरा जागीच ठार झाला. गुन्हा केल्यानंतर गितेश थेट पाचपावली पोलिस ठाण्यात गेला. त्याने स्वतःहून गुन्ह्याची कबुली दिली आणि हत्येचे हत्यार पोलिसांच्या ताब्यात दिले. पोलिसांनी गितेशसह त्याचा साथीदार भोजराज कुंभारे यालाही अटक केली आहे.

# शिक्षक भरती घोटाळ्यात भाजप आमदार

**वडेट्टीवार यांचा थेट आरोप**

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :

नागपूर विभागातील शिक्षक भरती घोटाळ्यात भाजपच्या एका स्थानिक आमदाराचा हात असल्याचा आरोप करत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी खळबळ उडवून दिली आहे. या प्रकरणी आतापर्यंत विभागीय उपसंचालक उल्हास नरड यांच्यासह शाळा संचालक व एका मुख्याध्यापकाला अटक करण्यात आली आहे.

आमदार संदीप जोशी व प्रवीण दटके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन या घोटाळ्याची एसआयटी चौकशी करण्याची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर विजय वडेट्टीवार यांनी उपरोक्त आरोप केला आहे.

ते म्हणाले, भाजपच्या आमदाराला त्याचा माणूस संचालक पदावर बसवायचा आहे. यासाठी उल्हास नरड यांचा बळी घेतला जात आहे. उल्हास नरड ओबीसी असल्यामुळे त्यांना डावलले जात आहे. यासाठी त्यांच्या विरोधात कटकारस्थान रचण्यात आले आहे. ज्या आमदाराने हे कारस्थान रचले आहे त्याचे नाव मी लवकरच जाहीर करणार आहे. माझ्याकडे तसे पुरावे येत आहेत.

शालार्थ आयडीचा वापर करून शिक्षकांची भरती झाली. या घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली होती. उल्हास नरड हे या चौकशी समितीचे अध्यक्ष होते.

चौकशी करताना त्यांना संबंधित आमदाराचे लोक त्यामध्ये सापडले. या प्रकरणात तब्बल ५०० शिक्षकांची भरती संशयास्पद आहे. सत्ताधाऱ्यांच्या संस्थांमध्ये झालेली बोगस भरती उघडकीस येऊ नये आणि त्यांच्यावर कारवाई होऊ नये यासाठी नरड यांच्याच विरुद्ध तक्रारी करून त्यांना अटक करण्यात आली. हा प्रकार चोर सोडून संन्याशाला फाशी देण्यासारखा आहे, असे वडेट्टीवार म्हणाले.

ही सर्व बोगस भरती २०१९ ते २०२३ या काळात झाली. त्यानंतर उपसंचालक पदावर उल्हास नरड नियुक्त झाले. या प्रकरणाशी कोणताही संबंध नसताना त्यांच्यावर कारवाई केली जात आहे. त्यामुळे यात काहीतरी गडबड असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. फक्त एका आमदाराच्या हट्टापायी पोलिसांच्या कारवाया सुरू आहेत, असेही काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी यावेळी सांगितले.

## घोटभर पाण्यासाठी महिलांचा जीवघेणा संघर्ष



घोटभर पिण्याच्या पाण्यासाठी माता-भगिनींना जीवघेणा संघर्ष करावा लागतोय, हे महाराष्ट्रासाठी अत्यंत लाजिरवाणे. पाण्यासाठी जर जीव मुठीत घेऊन विहिरीत उतरतावे लागत असेल तर हा कसला विकास असा सवाल वडेट्टीवार यांनी केला आहे. उत्सवांवर, कार्यक्रमांवर उधळपट्टी करायला पैसा आहे, पण लोकांना प्यायला पाणी देण्यासाठी नाही? नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी सरकार हजारो कोटी रुपये खर्च करायला तयार आहे. उत्सवांवर, कार्यक्रमांवर उधळपट्टी करायला पैसा आहे, पण लोकांना प्यायला पाणी देण्यासाठी नाही? हा कसला विकास? जनतेची दिशाभूल थांबवा आणि लोकांच्या प्रश्नांवर काम करा, असा टोला वडेट्टीवारांनी लगावला.

# किरीट सोमैय्या यांच्या कार्यालयात पिस्तुलधारी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :

भाजपाचे माजी खासदार किरीट सोमैय्या यांच्या कार्यालयात अज्ञात पिस्तुलधारी शिरल्याची घटना उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे.

या प्रकरणात मुलुंडच्या नवघर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. या पिस्तुलधारी व्यक्तीला माजी खासदार भाजपाचे नेते किरीट सोमैय्या यांच्या सुरक्षा रक्षकाच्या प्रसंगावधानाने रोखले असता त्याच्याकडे पिस्तुल असल्याचे उघडकीस आले आहे.

किरीट सोमैय्या यांच्या कार्यालयात एक अज्ञात नागरिकाची झडती घेतली असता त्याच्याकडे पिस्तुल लपवण्याचे उघडकीस आले आहे. खासदार किरीट सोमय्या हे दर जनता दरबार घेत असतात. त्यावेळी हा प्रकार उघडकीस आला.

# कंबरदुखी आणि गुडघेदुखीवर विनाशस्त्रक्रिया उपचार

**लोकारोग्य**



बदलत्या जीवनशैलीमुळे ऐन तारुण्यात अनेक प्रकारचे आजार उदभवतात. आहाराची चुकीची पद्धत, प्रचंड धावपळ, दगदग आणि मुख्य म्हणजे शारीरिक श्रम अर्थात व्यायामाचा अभाव या कारणामुळे हल्ली अनेक तरुणांमध्ये देखील ऐन तिशीत कंबरदुखीचा आणि गुढगेदुखीचा आजार सुरु होताना दिसतोय.

हाडांचे हे विकार सुरु होण्याचं मुख्य कारण म्हणजे मणक्याची चकती सरकणे आणि त्यामुळे मग कंबरेत प्रचंड वेदना सुरु होतात. गुडघ्याची वाटी देखील सरकते त्यातील वंगण कमी झाल्यामुळे देखील गुढघेदुखीचा आजार उद्‌भवतो. हाडाचे विकार म्हटले कि ते बरे करण्यासाठी फक्त शस्त्रक्रियाच असा एक गैरसमज जनमानसात रूढ असतो. पण खरं तर हाडाचे ९९ टक्के आजार हे शस्त्रक्रियेविना बरे होऊ शकतात, हे सत्य आहे ते कसे? हेच जाणून घेण्यासाठी सुप्रसिद्ध अस्थिव्यंगविकार तज्ज्ञ डॉ. श्रीकृष्ण ढोणे यांच्याशी साधलेला संवाद.

**गुडघेदुखी किंवा कंबरदुखी विना शस्त्रक्रिया बरे होऊ शकते यामागची पार्श्वभूमी नेमकी काय सांगाल?**

○ शस्त्रक्रिया किंवा सर्जरी हे वैद्यकशास्त्राने आपल्याला दिलेले दानआहे. शस्त्रक्रिया अगदी शेवटचा मार्ग म्हणजे आहे. शारीरिक व्यायामाचा अभाव, अरबट चरबट खाणे, मद्यपान, धूम्रपान अशी विविध व्यसन यामुळे पोटाचा घेर वाढतो. वजन प्रचंड वाढते आणि कंबर दुखी किंवा गुडघेदुखी सुरु होते. आहार पद्धती बदलली, दररोज व्यायाम केला आणि औषधांच्या मात्रा घेऊन या सर्व उपायांनी वजन नियंत्रित केले की, आपोआप कंबर दुखी किंवा गुडघेदुखीचा त्रास संपवता येतो.

आपल्या मणक्यांमध्ये ५ चकत्या आहेत. दुखणे वाढले की एक काढून टाकतो परंतु बाकीच्या चार चकत्या सुरळीत राहण्यासाठी वजन नियंत्रित कारण गरजेच असते.

**कंबरदुखीचा ज्यांना त्रास असतो त्यांच्या मणक्याची चकती सरकते ती पुन्हा व्यवस्थित करता येते का?**

○ होय, सरकलेली मणक्याची चकती पूर्ववत करण्यासाठी रुग्णाला ट्रॅक्शन चा उपचार अतिशय योग्य असतो. यामध्ये रुग्णाच्या कमरेला पेल्वीस पासून अध्यां बाजूला वर आणि खाली सुमारे २५ ते ३० किलो वजन बांधतात आणि यादरम्यान रुग्णांचे जेवण कमी केलं जात. हा उपचार दोन तीन दिवस केला कि, रुग्णाचे वजन कमी होते आणि त्याचे दुखणे देखील कमी होते. हा आपल्याकडचा खूप प्रभावी उपचार आहे.

**इंडियन मेथड ऑफ म्यानिप्युलेशन ऑफ स्पाईन म्हणजे काय?**

○ ही उपचार पद्धती रुग्णांकरिता एक सिक्रेट आहे. जेंव्हा रुग्ण पाठदुखीचा किंवा कंबर दुखीचा आजार घेऊन रुग्णलयात येतात, तेंव्हा आम्ही त्याची त्याचे दोन्ही पाय पोटाजवळ घेऊन पाठ मोडतो त्यामुळे कट्‌कन आवाज येतो. जी सरकलेली डिस्क असते ती यामुळे पूर्ववत होते आणि ती आत जाते. या उपचारामुळे रुग्णाला देखील आनंद होतो तो दुखणे अचानक बंद झाल्यामुळे.

**अनेक वयोवृद्धाना गुडघेदुखी आणि कंबरदुखीचा आजार असतो तो बरा करण्यासाठी उपाय काय?**

○ ज्यांचं वय ७० च्या पुढे आहे अशा वयोवृद्ध रुग्णांना कंबरदुखी आणि गुडघेदुखीचा आजार हा कॉमन असतो. अशा रुग्णांना स्टिरॉइड चे इंजेक्शन देऊन हे दुखणे थांबवता येते. मात्र वयोवृद्धांनी आणि सर्वच वयोगटातील रुग्णांनाही नियमित जलतरण करायला हवे. योगासन त्यातही सर्वांगासन नियमित करायला हवे. भरपूर चालायला हवं आणि दररोज झोपताना पायांच्या मध्ये लोड घेऊन झोपायचे. यामुळे कंबरदुखी आणि गुडघेदुखीचा त्रास थांबवता येतो. आपल्या शरीरातील स्नायूंची काळजी घेणं महत्वाचं असत.त्यासाठीच दररोज व्यायाम करावा.केवळ कॅल्शिअमच्या गोळ्या घेऊन उपयोग नाही. शरीराचे वजन नियंत्रित करणे अत्यंत महत्वाचे असते. ■ ■

# फार्मा लाईव्ह एक्स्पो आणि समिट २०२५

बॉम्बे एक्झिबिशन सेंटर येथे अधिकृतपणे नुकतेच संपन्न झाले, जिथे जगभरातील हजारो फार्मास्युटिकल, मेडटेक आणि आरोग्यसेवा व्यावसायिकांचे स्वागत करण्यात आले. दक्षिण आशियाई फार्मास्युटिकल कॅलेंडरमधील सर्वात महत्त्वाच्या कार्यक्रमांपैकी एक म्हणून, हे तीन दिवसांचे एक्स्पो आणि समिट फार्मा इकोसिस्टममध्ये नवोपक्रम, सहकार्य आणि धोरणात्मक दूरदृष्टीसाठी एक नवीन बेंचमार्क स्थापित करण्यासाठी सज्ज होते.

फार्मा लाईव्ह एक्स्पो आणि समिटची तिसरी आवृत्ती अशा वेळी आयोजित केली गेली जेव्हा जागतिक फार्मास्युटिकल आणि मेडटेक उद्योग परिवर्तनात्मक बदलांमधून जात आहेत. नेक्स्ट-जेन फार्मा - एकत्रितपणे जागतिक उत्कृष्टता अग्रगण्य या थीमसह हा कार्यक्रम अचूक औषध, एआय-चालित औषध शोध, शाश्वत पॅकेजिंग, डिजिटल आरोग्य नवोपक्रम आणि विकसित होत असलेल्या नियामक चौकटींसारख्या प्रमुख ट्रेंडभोवती गंभीर संवादाला चालना देण्यासाठी डिझाइन केलेला एक एक्स्पो होता. ICEXPO द्वारे आयोजित फेडरेशन ऑफ फार्मास्युटिकल अँड अलाइड सारख्या उद्योग संस्थांकडून सल्लामसलत आणि पाठिंबा मिळालेला प्रॉडक्ट्स मर्चंट एक्सपोर्टर्स या एक्स्पोमध्ये २२५ हून अधिक प्रदर्शक सहभागी झाले आणि २० हून अधिक देशांतील आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींसह २०,००० हून अधिक अभ्यागत उपस्थित राहिले. ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com



# जिल्हा परिषदेसमोरच शासन निर्णयाची होळी

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. २१ :

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे आज बुलढाणा शहरात आंदोलन करण्यात आले. हिंदी सक्ती विरोधात बुलढाण्यात मनसे आक्रमक झाली असल्याचे यावेळी दिसून आले. यावेळी मनसेच्या वतीने जिल्हा परिषदेसमोर हिंदी भाषा सक्ती संदर्भात निर्गमित शासकीय निर्णयाची होळी केली.

मनसे कार्यकर्त्यांनी हिंदी भाषा सक्तीच्या जीआरची होळी करण्यात आली. दरम्यान, हिंदी भाषा सक्तीच्या जीआरची प्रत फाडत व दहन करीत मनसे कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. यावेळी देण्यात आलेल्या, ह्यछत्रपती शिवाजी महाराज की जय, राज ठाकरेंचा विजय असो, हिंदीची सक्ती चालणार नाही चालणार नाही, या घोषणानी परिसर दुमदुमला. हिंदी सक्तीचा निर्णय तातडीने मागे घेण्यात यावा, अन्यथा तीव्र आंदोलन उभारू असा इशारा मनसेचे जिल्हाध्यक्ष गणेश बरबडे यांनी प्रसिद्धी माध्यमासोबत बोलताना दिला.

# हे तर बदनाम करण्याचे संघाचे षडयंत्र

**काँग्रेस प्रवक्ते प्रा. अजय उपाध्याय यांची टीका**

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :



स्वातंत्र लढ्यातील सहभागी व्यक्ती, कुटुंब, राजकीय पक्ष, संस्थांविषयी खोटेनाटे आरोप करून आणि ईडीसारख्या यंत्रणेचा दुरुपयोग करून बदनाम करण्याचे राजकीय षडयंत्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा एजेंडा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप त्यानुसार राजकीय सुडबुध्दीने काँग्रेस आणि त्यांचा नेत्यांविरुद्ध बेछुट आरोप करत आहेत, अशी टीका काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते प्रोफेसर अजय उपाध्याय यांनी येथे केली. ते नागपूर प्रेस क्लबमध्ये पत्रकारांशी बोलत होते.

याप्रसंगी काँग्रेसचे शहराध्यक्ष विकास ठाकरे, महाराष्ट्र काँग्रेस प्रदेश सचिव संदेश सिंगलकर, प्रा. दिनेश बानाबाकोडे उपस्थित होते.

स्वातंत्र्याच्या लढ्यातील जीवंत प्रतिक नॅशनल हेरॉल्डावर ईडी कारवाईत संघाचा अप्रत्यक्ष हात आहे. संघाच्या निर्देशानुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी हे गांधी परिवाराची प्रतिमा मलिन करण्याचा एककलमी कार्यक्रम राबवत आहे. असे करून वाढलेली महागाई, बेरोजगारी व दोन मित्रांची अचानक वाढलेली संपत्ती यावरून जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी केंद्र सरकारचे षडयंत्र आहे.

नॅशनल हेरॉल्ड प्रकरणात ईडीने केलेल्या आरोपात मालमत्ता किंवा रक्कम हस्तांतरित झालेली नाही. बॅलेन्सशिटला कर्जमुक्त करण्यासाठी कर्जाला इक्विटी बदलण्यात येते. ही सामान्य प्रक्रिया आहे. तसेच कायदेशीरपणे आहे. जर त्यात रक्कम नसेल तर काळपैसा पांढरा होण्याचा (मनि लॉंड्रींग) प्रश्न उदभवत नाही.

परंतु मोदींनी राजकीय षडयंत्र रचून ईडीला आपला निवडणूक विभाग बनवले आहे. राजकीय सूड घेण्यासाठी वारंवार ईडीचा दुरुपयोग केला जात आहे. ईडीने दाखल केलेल्या केवळ १ टक्के प्रकरणात आजवर शिक्षा झाली आहे. आणि ईडीने जे राजकीय प्रकरण दाखल केले आहेत, त्यात ९८ टक्के प्रकरणे सत्ताधारी भाजपच्या प्रतिस्पर्धी पक्षातील नेत्यांवर आहेत, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

# न्यायालयात पोहोचली घोरपड



■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २१ :

जलाशय व तलाव आटल्यामुळे वन्यजीव पाण्यासाठी शहरी भागाकडे वळत आहेत. आज सोमवारी चंद्रपूर जिल्हा ग्राहक न्यायालयात एका घोरपडीने बस्तान मांडल्याने एकच तारांबळ उडाली.

जिल्ह्यात उन्हाचा पारा चांगलाच वाढला आहे. तापमान ४४.६ अंश सेल्सिअस पर्यंत गेल्याने रस्ते ओस पडले आहेत. या शहराला लागून ताडोबाचे जंगल आहे. या जंगलातील वन्य प्राणी देखील पाण्याच्या शोधात शहरात दाखल होत आहे.

उन्हाच्या तीव्रतेमुळे वन्यजीव, पशु पक्षी यांचीही पाण्यासाठी धावाधाव होत आहे. जंगलातून शहरात दाखल झालेली ही घोरपड तीव्र उन्हात पाण्याच्या शोधात थेट जिल्हा ग्राहक न्यायालयाच्या कार्यालयात पोहचली.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातच ग्राहक न्यायालय कार्यालय आहे. तिथे तहानलेल्या व थकलेल्या घोरपडीने पाणी पिऊन तहान भागवली. काही वेळाने न्यायालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना घोरपड दिसली. न्यायालयात घोरपड आल्याची चर्चा सुरू झाली. घोरपड बघण्यासाठी एकच गर्दी उसळली.

न्यायालयातील कर्मचारी यांनी याची माहिती वनविभाग आणि इको-प्रो संस्थेचे अध्यक्ष बंडू धोत्रे यांना दिली. माहिती मिळताच बंधू धोत्रे यानंतर तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. यावेळी वन्यजीव मित्रांनी घोरपडीला पकडून सुरक्षितपणे निसर्गमुक्त केले.

# ट्रकच्या धडकेत तिघांचा मृत्यू

## पुणे महामार्गावर अपघात, १४ जखमी

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २१ :

भरधाव ट्रकने इनोव्हा कारला दिलेल्या धडकेमुळे झालेल्या साखळी अपघातात ३ जण ठार व १४ जण जखमी झाले. ही घटना रविवारी रात्री मुंबई - पुणे महामार्गावरील खंडाळा परिसरात घडली.

लोणावळा शहर पोलिस ठाण्यात सागर पांडुरंग इंगुळकर (रा. पुणे) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ट्रक पुण्याकडून मुंबईच्या दिशेने जात असताना त्याने इनोव्हा कारला मागून जोरात धडक दिली. यामुळे इनोव्हा कार समोरून येणाऱ्या एर्टिगा कारवर आदळली.

या दुर्घटनेत प्रिया सागर इंगुळकर (पुणे), निलेश संजय लगड (४२, रा. पुणे), त्यांची मुलगी श्राव्या लगड (१२) यांचा जागीच मृत्यू झाला. एर्टिगा कारमधील शरयू, रूद्राक्ष, अषिका मोगल, आरव मोगल, अर्ष व आरसित लगड या प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली.

त्याचप्रमाणे इनोव्हा कारमधील अश्विनी रमेश जाडकर (४३), ओमकेश रमेश जाडकर (२२), सुमित तुकाराम कदम (२४), पुष्कर लक्ष्मण शेळकंदे (२५), जिगनेश रमेश जाडकर (१२), संजय नामदेव वाल्हेकर (४२) आणि विमल नामदेव वाल्हेकर (६९), सर्व रा. भिवंडी, जि. ठाणे हेही किरकोळ जखमी झाले आहेत.

अपघातानंतर ट्रकचालक घटनास्थळावरून पळून गेला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. या प्रकरणाचा तपास लोणावळा शहर पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल लाड करत आहेत.